
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



मार्च १९८१ ] [ किंमत १ रु.


श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.



▲ संमेलनाचे सुरवातीला श्रीसाईबाबांसमोर निरांजन लावताना अध्यक्ष सौ. मुळे, शेजारी कोर्टरिसिव्हर श्री. काकरेसाहेब

## .संमेलनातील दृश्ये

सौ. सरोजिनी मुळे अध्यक्षीय भाषण करताना, शेजारी श्री. काकरेसाहेब ▼



जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ५९ वे )    किंमत एक रुपया    ( अंक १२ वा

: कार्यालय :

'साईनिकेतन'', प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३३६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

करितां अवलीला चरणवंदन ।
समस्त पापां होय क्षालन ।
मग जो भावें भजन-पूजन ।
करी तो त्याहूनही धन्य ॥२॥

पाहतां जयाचें सस्मित मुख ।
विसरे समस्त संसार दुःख ।
ठायींच विरे तहान भूक ।
ऐसें अलौकिक दर्शन ॥३॥

'अल्ला मालीक' जया ध्यान
जो निष्काम निरभिमान ।
निर्लोभ निर्वासन जयाचें मन ।
तयाचें महिमान काय वानूं ॥४॥

अपकाऱ्यांही जो उपकारी ।
ऐसी शांति जयाचे पदरीं ।
तया न विसंबे कोणीही क्षणभरी ।
द्यावा निजांतरी निवास ॥५॥

राम-कृष्ण राजी वाक्ष ।
संत ही नाक्ष वा एकाक्ष ।
देव रूपें सुंदर सुरुप ।
आनंद स्वरुप संत सदा ॥६॥

—श्रीसाईसच्चरित-अध्याय ४४ वा

श्रीसाईलीला
साठाव्या वर्षाचा
पहिला अंक
१ एप्रिल १९८१
रोजी थाटात
प्रकाशित होणार


—संपादक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | — भक्तीने श्रीसाईंची गाठभेट साधा |
| २) | थोर संतपुरुष श्रीराऊळ महाराज | — श्री. गणपतराव सामंत |
| ३) | महानसंत श्रीनाथनंगे महाराज | — श्री. दिलीप लांडे |
| ४) | २५ वर्षांची अविरत श्री.साईसेवा | — श्री. अवधूत रावजी शिंदे |
| ५) | एक नाविन्यपूर्ण उपक्रम | — कु. रेखा दिघे |
| ६) | मा. राज्यपाल यांची शिर्डीस भेट | — ,, ,, |
| ७) | लेखक-कवी स्नेहसंमेलन ७ वे | — श्रीसाईनंद |
| ८) | आपल्या जीवनात बाबांना सामावून घ्या | — श्री. रा. ब. बारओ |
| ९) | श्रीसाईबाबांचे शक्तीस्वरूप | — श्री. चकोर आजगावकर |
| १०) | जीवनातील आनंद | — श्री. बबन धोंडू येरम |
| ११) | हरवलेली बॅग सापडली | — रमा व्यंकटराव मुळे |
| १२) | भक्तांची काळजी बाबांना | — श्री. नंदकुमार खेडेकर |
| १३) | श्री बाबांची सत्ता | — सौ. सुनंदा कोकाटे |
| १४) | साईभक्तास साईभक्ताची विनंती | — सौ. सुनिता चावक |
| १५) | मी बी. ए. पास झाले | — निता ना. सावंत |
| १६) | तुमच्या सामान्य ज्ञानाची कसोटी | — श्री. माधव गोरे |
| १७) | मिशन डिव्हाइन-परीक्षण | — श्रीसाईनंद |
| १८) | श्रीसाईगीत तुषार | — श्री. सुहास देसाई |
| १९) | सुहासला बाबांनी दृष्टांत दिला | — श्री. पांडुरंग मोरे |
| २०) | शिरडी वृत्त | — जानेवारी १९८१ |

# भक्तीने श्रीसाईंची गाठभेट साधा

स. न. वि. वि.




जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत मानवी जीवन कसे सुखी होईल याचे निरनिराळे प्रयोग आज जगात सर्वत्र चालू आहेत. परंतु कोणीही कितीही प्रयत्न केला तरी संपूर्ण मानवी जीवन सुखी होणे अवघड आहे. कारण जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे एवढेच जीवन काही संपूर्ण जीवन नाही. जन्मापूर्वीच्या जीवनाचा, जन्मल्यापासून मृत्यूपर्यंतच्या जीवनाचा व मृत्यूनंतरचे जीवनाचा पूर्ण अभ्यास केला तर संपूर्ण मानवी जीवन सुखी होणे शक्य आहे.

आज भौतिक सुधारणांची वाढ इतक्या झपाट्याने होत आहे की लोकांचे संपूर्ण लक्ष तिकडेच वेधले आहे. उद्या कोणता नवीन शोध लागणार याची प्रत्येकजण वाट पाहू लागला आहे. त्यामानाने मानवी जीवनाचे मूलभूत प्रश्न सोडविण्याकडे फार थोडे लक्ष दिले जात आहे.

बाह्य विश्वाचे, निसर्गाचे स्वरूप आपल्याला कळू शकते. निसर्गाचा अफाट पसारा आपण डोळ्यांनी पाहू शकतो. असंख्य तारामंडल, चंद्र, सूर्य, उत्तुंग पर्वतांच्या रांगा, विशाल महासागर, विविध रंगी वनश्री आपण जेव्हा पाहतो तेव्हा विश्वाचे नित्यनूतन स्वरूप आपल्या लक्षात येते. परंतु आपणाला घडणारे सृष्टीचे दर्शन आणि तिचे खरे वास्तव स्वरूप ही एकच आहेत असे मानणे मात्र धोक्याचे आहे. एखादी टाचणी आपणास सरळ रेषेत दिसते परंतु तीच जर सूक्ष्मदर्शक यंत्राखाली ठेवली की वाकडी-तिकडी दिसू लागते. लोखंडाचा तुकडा आपणास घन दिसतो परंतु क्ष किरणांनी त्याचे छायाचित्र काढले की तो छिद्रयुक्त दिसू लागतो. आज लोखंडाच्या तुकड्यात फिरणाऱ्या अणुपरमाणूंची गति मोजता येते. अशा प्रकारे कोणत्याही पदार्थाचे आपण सूक्ष्म रूप पाहू लागलो की नकळत अध्यात्माच्या राज्यात जाऊन पोहचतो.

जे या फुटक्या देहादि आकारात दाट भरलेले असतानाही भूत, भविष्य, वर्तमानकाळात गळत नाही. त्याचा सूक्ष्मपणा पाहू गेल्यास ते शून्य आहे असे वाटते पण ते वस्तुस्थितीने शून्य नाही तर सूक्ष्म आहे. ते आकाशाच्या पदरातून गाळून

घेतले आहे. त्यामुळे ते अत्यंत सूक्ष्म आहे. असे जे सूक्ष्म असूनसुद्धा देहाची झिरझिरीत पिशवी हलविली तरी पण ते त्यातून गळत नाही, ते 'परब्रह्म' होय. आणि देहादि आकाराचा जन्म झाल्याने जे जन्माचा विकार जाणत नाही, आणि आकाराचा नाश झाल्याने ज्याचा कधी नाश होत नाही याप्रमाणे आपल्या सहजस्थितीत असणारे, ज्याला ब्रह्मासारखी अबाधित नित्यता आहे त्याला 'अध्यात्म' असे म्हणतात.

भक्तिच्या महाद्वारातून अध्यात्म राज्यात कसा प्रवेश करावयाचा याचा विचार आपणास करावयाचा आहे. भक्तियोग म्हणजे हृदयापासून भगवंताचा शोध घेणे. या शोधाचा आरंभ प्रेमात, त्याचप्रमाणे त्याचे अस्तित्वही प्रेमात असून त्याचा शेवटही प्रेमात होतो. जो भगवंतावरती आत्यंतिक प्रेम करू शकतो तो सर्वांवरही प्रेम करू शकतो. द्वेषाचा, मत्सराचा विचार त्याच्या मनात निर्माण होत नाही. प्रेमामुळे तो सदैव समाधानी, तृप्त असतो.

प्रारंभी जीवनातील काही गरजा पूर्ण होण्यासाठी माणूस, देवाची भक्ती करू लागतो. त्याचा त्याला काही प्रमाणात लाभ होतो. परंतु जसे जसे तो हृदयापासुन भगवंताची भक्ती वाढवू लागेल तसे तसे देवाजवळ काही मागण्याची इच्छा कमी होत जाईल. भक्ती ही कर्माहून मोठी आहे. कारण कर्मामध्ये व योगामध्ये कोणता ना कोणता हेतू साध्य करावयाचा असतो. परंतु भक्तीचा हेतू भक्ती आणि तिचे फलही भक्ती. भक्ती साध्य करावयाचा मार्गही भक्ति आणि या मार्गाचे अंतिम फलही भक्ती.

जगातील अनेक थोर संतपुरुषांनी या भक्तीमार्गाचा अवलंब केलेला दिसून येतो. भक्तीमार्गाचे वैशिष्ट्य म्हणजे हा मार्ग सोपा आहे. परंतु या मार्गामध्ये एक भीतीचे ठिकाणही आहे. सामान्य भक्तीच्या पायरीवरून काही वेळा धर्माबद्दल अभिमान निर्माण होतो. आपलाच मार्ग बरोबर व इतरांचा चुकीचा असे वाटू लागते ज्याचे मन विशाल झाले नाही तो आपल्या देवतेविषयीचा आदर दुसऱ्यांचा द्वेष करून व्यक्त करत असतो. व्यक्तिविषयक विचारांचा त्याच्या मनावर पगडा बसलेला असतो. स्वतःच्या पंथाच्या बाहेर तो पहावयास तयार नसतो. भक्ती मार्गातील ही खालची पायरी असून हिला गौणी भक्ती असे म्हणतात.

भक्ती अत्यंत परिपक्व झाली म्हणजे तिला पराभक्ती असे म्हणतात. अशा प्रकारचा भक्त ईश्वराच्या अत्यंत जवळ पोहोचलेला असतो. त्यामुळे त्याचे मनात कोणाबद्दल मत्सर नसतो. मन शुद्ध व विशाल झालेले असते. दृष्टी सात्विक झाली की जग मंगलमय दिसू लागते. अशा भक्तास विश्व नंदनवनाप्रमाणे भासू लागते.

सर्ववृक्ष कल्पद्रुम होतात. सर्व जलाशय गंगोदक बनतात. संत ज्ञानदेवांनी समदृष्टीचे वर्णन केले आहे—

सर्वत्र सदा सम । ते आपणची अद्वैत ब्रह्म ।
हे संपूर्ण जाणे वर्म । समदृष्टीचे ॥

काही लोकांच्या मनामध्ये हा प्रश्न निर्माण होतो की आपण ईश्वरावर प्रेम तरी का करावे ? माणसाला ही गोष्ट माहीत आहे की तो देह व आत्मा मिळून बनलेला आहे. पाश्चिमात्य लोक माणसाच्या देहासंबंधी विशेष प्रचार करतात. देहासंबंधी अनेक प्रकारचे संशोधन करतात. परंतु भारतामध्ये देहापेक्षा आत्मिक बाजूवर विशेष भर दिला जातो. भारतीय संस्कृती ही अध्यात्मप्रधान आहे व पाश्चिमात्य संस्कृती विज्ञानप्रधान आहे. मनुष्य का जगतो असा प्रश्न पाश्चिमात्य लोकांना विचारला तर ते सांगतात इंद्रियविषय, संपत्ती व मालमत्ता यांचा उपभोग घेण्यासाठी मनुष्य जगतो. आपणास असेच उपभोग कायम घेता यावेत म्हणून तो ईश्वराची भक्ती करत असतो. भारतीयांचा जीवन हेतू म्हणजे ' ईश्वर प्राप्ती ' होय. ईश्वरापेक्षा श्रेष्ठ असे काही नाही हे त्यांना माहीत असते. म्हणून तो देवावर निःस्सीम प्रेम करत असतो.

माणूस जितका कमी उन्नत असतो तितके त्याला विषयोपभोगात जास्त सुख मिळत असते. जसजसा तो उच्च अवस्थेत जातो तस तसे ईश्वराबद्दल प्रेम वाढू लागते. ज्या प्रमाणात त्याच्या विचारशक्ती व प्रेमाच्या शक्तीचा विकास होतो त्या प्रमाणात त्याची इंद्रियभोग भोगण्याची वासना कमी होते. ज्यावेळी एखादा मनुष्य अति विषयभोग भोगण्याची अपेक्षा करतो त्यावेळी तो नकळत पशुकोटीतील इच्छा करत असतो. आपल्याला अज्ञात असलेले उच्च तत्त्व माणसाला जेव्हा कळेल त्यावेळी इंद्रिय विषयक आसक्ती हळूहळू नाहीशी होईल.

मुख्य गोष्ट म्हणजे आपल्याला ईश्वराची ओढ लागली पाहिजे. खरोखर ईश्वराने सर्व विश्व बनविले परंतु आपण विश्व आहे म्हणतो पण देवाचे अस्तित्व जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. आपणास ईश्वराखेरीज सर्व काही हवे असते. आपल्या सामान्य गरजा बाह्य जगतातील वस्तूनीच भागत असतात. त्यामुळे आपणास ईश्वराचा एवढा ध्यास लागत नाही. जेव्हा आपल्या गरजा बाह्य जगत् पुरवू शकत नाही त्यावेळी त्या ईश्वराकडून पुरविल्या जाव्यात असे आपणास वाटू लागते. सर्वजण ईश्वराची भक्ती करतात म्हणून आपण करू लागलो तर त्याचा विशेष उपयोग होणार नाही. आपणास हवा थोडा वेळ मिळाली नाही तर जीव गुदमरून जातो, हवेची नितांत जरूरी वाटू लागते. तेवढ्या तीव्रतेने आपणास ईश्वराची ओढ लागली तर आपण भक्त होऊ शकतो.

आपण आपल्या मनाला प्रश्न विचारावा 'खरोखर तुला ईश्वराच्या भेटीची अत्यंत तीव्र इच्छा आहे काय?' जर भेटीची इच्छा तीव्र झाली असेल तर थोड्याच दिवसात प्रयत्नांनी निश्चित भगवंताचा साक्षात अनुभव येऊ शकेल. परंतु मुळातून ईश्वराच्या भेटीची इच्छा मनात निर्माण झाली नसेल तर सर्व ग्रंथ व विविध शास्त्रे तरी काय करणार? ग्रंथाचे शब्दशः अर्थ समजावून घेऊन विशेष लाभ नाही. ग्रंथाचे हृदय जाणले पाहिजे व ग्रंथाचे हृदय जाणण्यासाठी आपल्या हृदयातील प्रेम वाढविले पाहिजे. जसे जसे आपल्या हृदयातील प्रेम वाढत जाईल तस तसे आपल्याला ग्रंथाचे खरे आकलन होऊ शकेल.

अनेक सत्पुरुषांच्या जीवनामध्ये भगवंताच्या भेटीची तीव्र इच्छा निर्माण झालेली दिसून येते. म्हणून तर त्यांना ईश्वराच्या अस्तित्वाची अनुभूती आली. गाईच्या भेटीसाठी गोठ्यात बांधलेल्या वासराची जशी दृष्टी सैरभैर झालेली असते, पंखातल्या उबेसाठी व तिच्या चोचीतल्या चाऱ्यासाठी आसुसलेल्या पिलाची जशी चिवचिव चालू असते, वनात हरिणीचा मार्ग चुकलेल्या पाडसाची जशी अगतिक तडफड चालू असते. तशी देवाच्या भेटीबद्दल संतांची अवस्था झालेली असते.

एका नदीच्या काठावर एक सत्पुष स्नानासाठी गेले होते. तेथे एक तरुण मुलगा आला व सहज म्हणाला, 'मला ईश्वर पहावयाचा आहे. तो कसा भेटेल हे सांगा. त्या सत्पुरुषाने त्या मुलाला नदीत नेले आणि पाण्यात काही काळ दाबून ठेवले. त्याचा जीव कासावीस झाला व पुनः त्याला वर काढले. सत्पुरुषांनी विचारले, तुला आतमध्ये दाबून ठेवल्यावर काय वाटले? तो म्हणाला, पाण्यातून वर येण्याची जबरदस्त इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. त्यावेळी त्यांनी त्याला उत्तर दिले अशी जबरदस्त इच्छा तुझ्या मनात भगवंताला पाहण्यासाठी निर्माण होईल त्यावेळी तुला देव भेटेल. सहजासहजी देव कोठे आहे हे विचारून देव कळणार नाही.

तेव्हा साईप्रेमींनो, आपणही आपल्या मनात श्रीसाईंच्या भेटीची तीव्र इच्छा निर्माण करा!

# संत श्री राऊळ महाराज

—श्री. गणपतराव सामंत, एम.
निवासी व्यवस्थापक
श्रीमहालक्ष्मी मंदिर मुंबई



कोकण नररत्नांची खाण आहे. त्याचप्रमाणे ती संतभूमि आहे. या परशूरामभूमीत श्री साटम महाराज, दत्तावतार पावसचे महाराज, श्री भालचंद्र महाराज हे सत्पुरुष होऊन गेले, ही संतमालिका चालूच आहे.

मुंबई-गोवा या राजमार्गाने तुम्ही निघालेत की कुडाळ गावात जाण्यासाठी वरील राजमार्गावरून उजवीकडे वळण घ्यावे लागते. सावंतवाडीच्या अगोदर, त्या वळणावरून दोन किलोमिटर अंतरावर तुम्हाला कुडाळ लागते. तसेच पुढे गेल्यावर दोन किलोमिटर अंतरावर पिंगुळीतिठा लागतो व आसपास बरीच औद्योगिक वसाहत दिसते. डाव्या बाजूला पिंगुळी नावाचे चिमुकले गाव आहे.

या पिंगुळीकडे हल्लीच तेथील पुराणकालीन हस्तकलेमुळे लोकांचे लक्ष वेधले आहे. याच पिंगुळीत सद्गुरु श्री राऊळ महाराजांचे वास्तव्य आहे. श्रीसाटम महाराजांच्या दानोलीस, श्री भालचंद्र महाराजांच्या कणकवलीस जे आता स्थान प्राप्त झाले आहे तद्वतच श्री राऊळ महाराजांच्या पिंगुळीस प्राप्त होत आहे. दानोली, कणकवली, पावस आणि आता पिंगुळी तीर्थक्षेत्र बनत आहे.

अशा या पिंगुळी क्षेत्रातील श्री राऊळ महाराजांच्या काही आठवणी, अनुभव मी देत आहे. श्री साटम महाराज, श्री भालचंद्र महाराज, श्री गगनगिरी महाराज, श्री सत्यसाईबाबा यांचा प्रत्यक्ष सहवास मला लाभला पण जास्तीत जास्त सहवास श्री राऊळ महाराज यांचा लाभला व लाभत आहे. त्यांचे चमत्कार खाली देत आहे.

श्री राऊळ महाराज अचानक माझ्याकडे आले. मी श्रीसाईबाबांचे एक तैल-चित्र एका सुप्रसिद्ध आर्टिस्टकडून घेतले आहे, व त्याची पूजा करतो. त्या चित्रा-समोर श्री राऊळ महाराज उभे राहिले. मला व पत्नीला श्रीसाईबाबांच्या तसबिरी-समोर हात जोडून उभे राहाण्यास सांगितले. ते म्हणाले—'रे हो देव आसा ह्याका नमस्कार कर.– अशा तऱ्हेने माझी साईभक्ती मजबूत केली.

एकदा दुपारीच श्री राऊळ महाराज एक टेबलावरील घंटा घेऊन आले व माझ्या टेबलावर ठेवून ती मला वाजवून दाखवली व मलाही जोराने वाजवण्यास सांगितली. दोन दिवसातच माझी अधिकारपदावर नेमणूक झाली.

पिंगुळीला मी त्यांच्याकडे बरेच वेळा गेलो व बरेच अनुभव आले. एकदा मला त्यांनी आपल्या देव्हाऱ्यातील तुलसीमाला घातलेली श्रीनारायणाची तसबीर दिली व म्हणाले—" काळजी करू नकोस हो बरोबर आसा—" दुसऱ्या दिवशी मी व माझा मित्र मोटारने मुंबईस निघालो. मित्र गाडी चालवीत होता. मी त्याच्याशी गोष्टी करीत होतो. गाडीत आम्ही दोघे आमचे सामान व मागील सीटवर महाराजांनी दिलेली श्रीनारायणाची तसबीर पनवेल येईपर्यंत रात्र झाली व पावसास सुरुवात झाली. आम्ही गाडी वेगात ठेवली होती व अचानक माझ्या मित्राने ब्रेक लावले व आमची गाडी एका प्रचंड वृक्षासमोर थांबली. जरा पुढे गेली असती तरी आम्ही वरच पोचलो असतो. श्रीनारायणाने रक्षण केले व श्रीराऊळ महाराजांची वाणी खरी ठरली. तो फोटो, एक काठी बरेच सुटे पैसे या श्रीराऊळमहाराजांनी दिलेल्या वस्तू मी पूजेस ठेवल्या आहेत.

श्रीसाईबाबांस 'हो देव आसा' असे सांगणारे सत्पुरुष श्री राऊळ महाराज यांचा हा अनुभव वाचून आपणास धन्यता वाटेल. मी राजकारणी नाही पण काही वर्षांपूर्वी माझ्या एका निकटवर्ती व्यक्तीबरोबर मला एक महिनाभर राहावे लागले. ही व्यक्ती उत्तर रत्नागिरीतून खासदारकीसाठी उभी होती. आम्ही दररोज दोन-तीनशे किलोमीटर प्रवास करत असू. एके दिवशी नेहमीप्रमाणे आमची जीप पिंगुळी तिठयावर थांबली. सकाळची वेळ होती. अशावेळी श्री राऊळ महाराज वेळेवर बसले होते. मी त्यांना नमस्कार करण्यासाठी निघालो. इतक्यात तेच आमच्याकडे आले. मी त्यांचे पाय धरले. माझ्या बरोबरच्या व्यक्तीस महाराजांची ओळख करून दिली. महाराजांनी खिशातून पेन काढून या व्यक्तीस दिले. ही व्यक्ती निवडणुकीत पडणार याची खात्री असताना फक्त आमचे जिव्हाळयाचे संबंध असल्यामुळे मी राबत होतो. पराभव झाला पण डिपॉझीट जप्त झाले नाही. अनेक वर्षात राजकारणात स्थित्यंतरे झाली पण ही व्यक्ती राजकारणातून नामशेष झाली. पण जनता सरकार आल्यावर या व्यक्तीची गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली आहे. श्री राऊळ महाराजांनी दिलेल्या पेनचे महत्त्व कळले. उशीरा का होईना अधिकारपद मिळाले.

चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणून प्रथम चमत्कार लिहिलेत. श्रीसाईबाबांना देव म्हणणारे श्रीराऊळ महाराज खरोखरच पूज्य आहेत. प्रसन्न वृत्ति, सतेज व भव्य देह, सुचिर्भूत व्यक्तिमत्व म्हणजेच श्रीराऊळ महाराज. त्यांचे केव्हाही

दर्शन थ्या त्यांची धावपळ दिसेल. कोणाच्या गाडीतून, ट्रकमधून, मोटारसायकल वरून केव्हा कोठे निघून जातील याचा नेम नाही. थोडक्यात मूर्तिमंत चैतन्य त्यांचे बोलणे, कृति यात अर्थ भरलेला असतो. तुमची कसोटी होते, तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतात, भरघोस आशिर्वाद मिळतो. असा चालता बोलता सत्पुरुष भेटल्यानंतर जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते.

निसर्गरम्य कोकण नेहमी उपेक्षित राहीला. आंबे, पोफळी, साग, माड, काजू आणि रतांबे अशा बागांनी शृंगारलेल्या कोकणाची पुढाऱ्यांना आठवण होते फक्त मे महिन्यात व विशेषतः निवडणूकीच्या काळात. कशा सुधारणा होणार! अशा या परिस्थितीत श्रीराऊळ महाराजांसारखे सत्पुरुषच कोकणचा कायापालट करू शकतील. महाराज राहात असलेल्या पिंगुळीच्या परिसरात लघु उद्योगांची वाढ होत आहे त्याचप्रमाणे जरी स्थानिक लोकास काम मिळत नसले तरी मोठे कारखाने सुद्धा उभे आहेत. पण आज ना उद्या सर्व ठीक होईल महाराजांच्या तेथील वास्तव्यामुळे.

शेवटी श्रीराऊळ महाराजांना शतशः प्रणाम

---

## प. पू. राधाकृष्ण स्वामींसाठी पहिली आराधना

ऑलइंडिया श्रीसाईसमाजाचे अध्यक्ष व विख्यात साईभक्त प. पू. श्रीसाईपादानंद उर्फ श्री. राधाकृष्ण स्वामीजींचे १४ जाने. १९८० रोजी (पुष्य बहुला द्वादशी) निर्वाण झाले. त्यांचा प्रथम आराधना–स्मृतीदिन बंगलोर येथे त्यांच्या श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरमध्ये दिनांक ३०, ३१ जाने. व १ फेब्रु. ८१ रोजी साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी स्वामीजींचे हजारो भक्त दुरदुरुन आले होते. श्रीस्वामीजींच्या संगमरवरी पूर्णाकृती पुतळ्याची स्थापना येत्या मेच्या पहिल्या आठवड्यात बंगलोर येथे होणार आहे. श्री. स्वामीजींना आमचे कोटी कोटी प्रणाम.

# एक महान संत श्री नाथ नंगे महाराज

—श्री. दिलीप शंकरराव लांडे
मु. पो. तऱ्हाळा ता. मंगरुळनाथ
जि. अकोला ( विदर्भ )

जगाच्या कल्याणा संताच्या विभूती
देह कष्टविती उपकारे ॥१॥ 'श्री तुकाराम'

…… तुकाराम महाराजांनी संतांचे हे जे वर्णन केले आहे. हे काही खोटे नाही. अशा प्रकारच्या थोर विभूती या जगती-तलावर अनेक होऊन गेल्या. त्यातल्या त्यात आपली महाराष्ट्र–भूमी तर अनेक संतांच्या सहवासाने पावन झालेली आहे. शेगावचे संत श्री गजानन महाराज, शिर्डीचे साईबाबा, नागपूरचे बाबा ताजूद्दिन, श्री संत गाडगे महाराज इत्यादी अनेक संतांचे आशिर्वाद या भूमिला लाभलेले आहेत. त्याच संतमालेतील एक रत्न म्हणजे विदर्भातील "डव्हा" या तिर्थक्षेत्री होऊन गेलेले एक महान संत "श्री. नाथ नंगे महाराज" हे होत.

नाथ नंगे महाराज हे एक विदेही अवलिया पुरुष होते. ज्या प्रमाणे शिर्डीच्या साईबाबांचे व शेगावच्या गजानन महाराजांचे जन्म स्थान आई–वडिलांचे नाव गाव कोणाला ज्ञात नाही. त्याच प्रमाणे नाथ नंगे महाराजांचे बाबतीत सुद्धा तसेच आहे. ते फिरत फिरत "डव्हा" येथे आले. डव्हा म्हणजे एक छोटेसे खेडे. प्रथम लोकांनी त्यांना वेडा पिसा म्हणून खुपच त्रास दिला. पण लवकरच त्यांना कळून आले की "हे एक अमोल रत्न आपणास लाभलेले आहे. महाराज दोन्ही डोळ्यांनी आंधळे व दोन्ही पायांनी पांगळे परंतु ते आपल्या आत्मशक्तीने कितीही अंतरावरील मनुष्य ओळखत असत. ते पांगळे जरी असले तरी नुसत्या पाठीच्या आधारे ते कितीही उंच झाड चढून जात असत. नेहमी हनुमान मंदिरात बसावे. तिथेच खावे तेथेच झोपावे. लघवी, विष्टा तेथेच करावी. त्यांच्या लघविस व विष्टेस कधीच घाण वास आला नाही. भक्तांनी दिलेला चहा दोन वेळ घ्यावा. विड्याची पाने ते मोठ्या आनंदाने खात त्यांना दररोज ४०० ते ५०० पाने लागत असत, अशी ही त्यांची दिनचर्या असे.

ज्यांना महाराजांचा सहवास लाभला असे अनेक भक्त आजही जिवंत आहेत ते महाराजांचे अनेक चमत्कार आजही सांगतात व अजूनही भक्तगणांना त्यांचा प्रत्यय येतो.

तऱ्हाळा येथील श्री. बापूरावजी पाटील ( वय ६५ वर्षे ) महाराजांचे परम-भक्त त्यांना अनेक साक्षात्कार घडलेले आहेत. त्यांनी महाराजांची तन-मन धनाने सेवा केलेली आहे. ऐन तारुण्यात त्यांचे दोन्ही डोळे गेले. त्यांना अजीबात दिसेनासे झाले. घरात कर्ता माणूस म्हणजे तेच शिवाय दोन मुले व एक मुलगी, पत्नी यांचा भार वहाणे परीस्थीती साधारण अशात बाबांना ते शरण गेले व त्यांनी बाबांची इतकी सेवा केली की शेवटी बाबांनी त्यांच्यावर प्रसन्न होऊन त्यांना "नेत्र दृष्टी" प्रदान केली. आजही कोणतेही काम करायचे झाल्यास ते बाबांचे दर्शन घेतल्या-शिवाय करीत नाहीत. बाबांचे आशिर्वादे त्यांना आज कोणत्याच गोष्टीची कमी नाही.

ते आजही बाबांचे बरे अनुभव सांगतात. बाबा सांगण्याच्या ओघात ३०० वर्षी पूर्वीच्या गोष्टी सांगत असत. त्यांच्या बोलण्यातून तिरुपती बालाजी शिरडीचे साईबाबा शेगावचे गजानन महाराज यांचा उल्लेख होत असे. ते म्हणत आम्ही सारे एकच आहोत. असे अनेक चमत्कार सांगता येतील.

अशा ह्या महान सत्पुरुषाने गुरुदत्त चरणी गुरुवारी व सुर्याच्या उदया-बरोबर अक्षयतृतीयेच्या दिवशी १९५० साली आपला जीवन काल संपवला. नाथ नंगे महाराज समाधीस्त झाल्यानंतर महाराजांचे परमशिष्य 'प. पू. विश्वनाथ महाराजां'नी महाराजांचे म्हणण्यानुसार 'डव्हा' संस्थानची गादी सांभाळली व नाथनंगे महाराजांचे आशीर्वादे त्यांनी 'डव्हा' या स्थानाला तीर्थक्षेत्राचे रूप प्राप्त करून दिले. आज 'डव्हा' येथील मंदिरात दर्शनास गेल्यास मनास शांती मिळते. मंदिराची सुंदर रचना, ते भव्य बांधकाम प. पू. विश्वनाथ महाराजांनी कोणत्याही इंजीनीयरची मदत न घेता स्वतःच्या कल्पनेतून साकार केले आहे. ते पाहून मनुष्य आश्चर्यचकित झाल्यावाचून रहात नाही. शिर्डीस ज्याप्रमाणे 'विजया दशमी' स व शेगाव येथे 'रामनवमी 'स ज्याप्रमाणे भव्य यात्रा भरते त्याचप्रमाणे 'रथसप्तमी 'स डव्हा येथे भव्य यात्रा भरते. हजारोंच्या संख्येने लोक महाप्रसादाचा लाभ घेतात. महाप्रसादाचे ते शिस्तबद्ध कार्य पाहून नेत्राचे पारणे फिटते.

श्री. प. पू. विश्वनाथ महाराज मागील वर्षी दिवाळीस ( दि. २५ आक्टो. १९७९ ) समाधीस्थ झाल्यानंतर तेथील विश्वस्त मंडळ प. पू. पंडीत बाबांच्या सल्ल्याने कारभार पहात आहेत. संस्थानची यशस्वी वाटचाल अजूनही चालू आहे.

"प. पू. नाथ नंगेमहाराजांचे चरणी कोटी-कोटी प्रणाम."

आले एक अवलीया संत डव्हा गावी त्या राहिले, होता वास कुठे प्रगटले कोणी न हे जाणिले, नावाने जन नाथ-नंगे महाराज वदती प्रेमे तया साधुला मी भावे नमितो सदैव सदया श्री नाथा तुला ॥ १ ॥

ॐ शांती शांती......

# २५ वर्षांची अविरत श्री साईसेवा

—श्री. अवधूत रावजी शिंदे
चौकशी कार्यालय प्रमुख शिर्डी

श्री. वि. श्री. आपटे हे संस्थानचे अकौंटन्स क्लार्क म्हणून दिनांक २२।२।१९५६ रोजी संस्थान सेवेत रुजू झाले. प्रथम त्यांनी दरमहा रु. १५०/– प्रमाणे पगार घेऊन या बाबांच्या स्वार्थ साधून परमार्थ साधण्याच्या सेवेस प्रारंभ केला. स्वार्थ एवढ्याचसाठी म्हणावा लागेल की पगार घेऊन ते परमार्थ साधत होते. अशा प्रकारे श्री. आपटेसाहेब यांची नोकरी ट्रस्टींच्या काळापासून आजतागायत अनेक कोर्ट रिसीव्हरांच्या अधिकारातून अव्याहत चालू आहे.

१९६८ साली झालेल्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाची मुंबई येथील सर्व जबाबदारी पार पाडण्यात श्री. आपटे साहेब यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. रिसीव्हर शिर्डीत असताना ही जबाबदारी त्यांनी अत्यंत चोखपणे सांभाळली. स्वतः बाजूला राहून फक्त चोखपणे व कसोटीने काम करणे, कोणत्याही कार्यक्रमाच्या वेळी पुढे न येता, काम मात्र योग्यपणे बजावणारे आमचे आपटे साहेब कधीही प्रसिद्धी-साठी हपापले नाहीत किंवा कधीही प्रसिद्धीसाठी कांस धरली नाही.

ट्रस्टी व संस्थान यांच्यातील वादामुळे जे काही वादळ संस्थानमधे ऊठले, त्या काळात सुद्धा स्वतः अत्यंत खंबीरपणे सर्व गोष्टींना तोंड देऊन, परंतु स्वतःच्या कामात मात्र काहीही कसूर न ठेवता त्यांनी नितांतपणे श्रद्धेने, सेवा म्हणूनच श्रीसाईबाबा संस्थानची नोकरी केली. मित्र व विरोधी पक्षातील लोकांशी सतत त्यांनी सलोख्याचेच नाते ठेवले, जे आजतागायत त्यांनी टिकवून धरले. कोणताही प्रसंग येवो, मग तो कितीही गंभीर असो, श्री. आपटेसाहेब यांनी अत्यंत खंबीरपणेच त्याला तोंड दिले. चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी असो वा कोणताही अधिकारी असो आमचे आपटेसाहेबांचे शिरडी मुक्कामात त्यांचे खोली नंबर ४५ चे दार सर्वांना २४ तास उघडे असते. आपटेसाहेब शिर्डीत केव्हा येणार याची डोळ्यात तेल घालून आमचा कर्मचारी वर्ग अगदी वाट पहात असतो. आपटेसाहेब आल्याची जरा चाहूल लागली की प्रत्येकाच्या येरझारा सुरू होतात. सर्वांच्या अडीअडचणीतून मार्ग

काढणारी संबंध संस्थानमध्ये एकच व्यक्ती आहे, ती म्हणजे आमचे आपटेसाहेब ही सर्वांची नितांत श्रद्धा. आपटेसाहेब म्हणतील तेच करणारे आमचे कर्मचारी सहसा त्यांचे शब्दाचे बाहेर जाणारच नाहीत. लोकांच्या अडचणी कोणत्याही असोत घरगुती असोत किंवा नोकरीतील असोत, या अडचणीतून मार्ग काढलाच्च तर फक्त आपटेसाहेबच्च काढू शकतील असा गाढ विश्वास. क्वचित प्रसंगी पैशाच्या अडचणीत झेपेल असा मार्गही आपटेसाहेब काढून देतात.

असे हे आमचे आपटेसाहेब म्हणजे संस्थानचा चालता बोलता इतिहासच असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. श्री. आपटेसाहेब यांचे नोकरीस दिनांक २२।२।१९८१ रोजी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. प्रथम १५०/- रुपयांवर काम करणारी ही व्यक्ती आज स्वतःच्या कर्तबगारीवर, गोड स्वभावामुळे तसेच अंगी असलेल्या सचोटीमुळे आज संस्थानच्या चीफ अकाऊन्टस ऑफिसर या पदापर्यंत पोहचू शकले. ट्रस्टीच्या कारकिर्दीपासून ते रिसीव्हरचे कारकिर्दीपर्यंत त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा व्यक्तीगत वादंग किंवा आक्षेप नाही. वेळ प्रसंगी अत्यंत कठोर होणारे आमचे आपटेसाहेब अत्यंत उदार व प्रेमळ मनाचे असून ते संस्थानमधील काय किंवा ज्याच्याशी त्यांचा घनिष्ट संबंध आहे अशा व्यक्तीमध्ये हवेहवेसे वाटतात. कोणतीही गोष्ट हसतमुखाने स्वीकारणे हे ज्यांच्या आयुष्याचे ध्येय. आपण ज्या देवाची नोकरी करीत आहेत तीच देवाची भक्ती असे ते मानतात. "आमचे आपटेसाहेब म्हणजे खरे कर्मयोगी."

सांसारिक अडचणी ह्या प्रत्येक संसारी माणसाच्या पाचवीलाच पुजलेल्या असतात. त्यातल्या त्यात पत्नीचे आजारपण हे तर सर्व संसाराचीच घडी विस्कटून टाकते. असाच दुर्धर प्रसंग सुमारे दोन वर्षापूर्वी रा. आपटेसाहेब ह्यांचेवर कोसळला त्यांच्या पत्नीला अर्धांगवायूचा झटका आला आणि त्या कित्येक दिवसपर्यंत संपूर्ण बेशुद्धावस्थेत होत्या. मुंबईतील मोठमोठया सर्व डॉक्टरांनी त्यांच्या जगण्याचीच आशा सोडून दिली होती. परंतु डॉक्टरांचे दीर्घ परिश्रम, श्री. आपटेसाहेब व त्यांचे नातेवाईक ह्यांचे अपार कष्ट व श्रीसाईबाबांची कृपा ह्यांमुळे आपटेसाहेबांच्या पत्नी ह्या आजारातून बऱ्या झाल्या. श्री. आपटेसाहेबांनी आजपर्यंत शिर्डी संस्थानची व पर्यायाने श्रीसाईबाबांची सेवा निरलसपणे केली व त्याचे फळ म्हणून त्यांची संस्थानच्या कार्यालयात उत्तरोत्तर बढती होत गेली. त्यांच्या हातून संस्थानची सेवा अशीच घडत राहो म्हणून त्यांना उदंड आयुरारोग्य लाभावे व श्रीबाबांची अशीच कृपा त्यांच्यावर रहावी अशी मी साईचरणी प्रार्थना करतो.

असे एक उदात्त व्यक्तिमत्व असलेले आमचे आपटेसाहेब आम्हाला असेच वर्षानुवर्ष लाभोत हीच साईचरणी प्रार्थना!

*

# एक नाविण्यपूर्ण उपक्रम

—कु. रेखा दिघे
वरिष्ठ लेखापाल शिर्डी संस्थान



श्रीसाईबाबा संस्थानचा कारभार मा. कोर्ट रिसीव्हर, यांचे देखरेखीखाली चालू आहे. वेगवेगळ्या खात्यातील लोक आपले काम अत्यंत चोखपणे करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात. अशावेळी नोकरवर्गात संतोष कायम ठेवून त्यांना अधिकाधिक उत्कृष्ठ काम करण्यास प्रवृत्त करणे हे अधिकारी वर्गाचे कर्तव्य आहे, एवढ्या मोठ्या संस्थेत स्वच्छता हा त्यातील एक फार महत्वाचा भाग आहे. जिथे स्वच्छता उत्कृष्ट आहे अशा ठिकाणी आरोग्यही रहाते. तेव्हा आरोग्यखाते हे अत्यंत महत्वाचे खाते, सर्व ठिकाणी असते. या खात्यातील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस प्रोत्साहन देणे व काम करण्यास उत्तेजन देणे अत्यंत महत्वाचे, या करीता, श्रीसाईबाबा संस्थानचे माजी शासकीय अधिक्षक श्री. गोडखिंडी, यांनी त्यांच्या पत्नी सौ. गोडखिंडी यांच्या नावे रु. ५०१|-. देणगीरूपाने साईबाबा संस्थानला दिले व त्या रकमेवरील व्याजातून आरोग्य खात्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस मानधन देण्याचा उपक्रम सुरू केला. ही एक विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे.

या बक्षिसाचा बहुमूल्य मान प्रथम श्री. दाजिबा लहानू सावळे आरोग्यखाते कर्मचारी यांना मिळाला, श्री. दाजीबा हे प्रथमपासून संस्थान नोकरीत आहेत. आपले पूर्वायुष्य अत्यंत कष्टमय अशा परिस्थितीतून गेलेले आहे असे श्री. दाजीबा सांगतात. घरचा सर्व भार सांभाळण्याची जबाबदारी त्यांचेवर असल्यामुळे प्रथम-

पासूनच त्यांनी संस्थानचे नोकरीचा स्विकार केला. घरातील सर्व भार सांभाळून अत्यंत आनंदी वृत्तीने श्री. दाजीबा हे जीवनाची वाटचाल यशस्वीपणे करत आले आहेत. श्री. दाजीबा हे प्रथम चौकशी कार्यालयात व नंतर आरोग्य खात्यात नोकरीस लागले. कोणत्याही प्रकारचे व्यसन नसलेली ही व्यक्ती, सांगाल ते काम आनंदाने स्वीकारून चोखपणे पार पाडत असते. स्वीकारलेले काम हे फक्त काम नसून ही साईसेवाच आहे ही भावना सतत उराशी बाळगून कर्तव्यनिष्ठ दाजीबा आपले काम करीत असतात. वरिष्ठांचा योग्य तो मान ठेवण्याचा व आपले काम अधिकाधिक चोख करण्याचाही ते अत्यंत आटोक्याने प्रयत्न करीत असतात.

परमेश्वराच्या घरी ' देर है लेकिन अंधेर नहीं. ' देवाच्या दारी काम करणाऱ्या या दाजीबाच्या कामगिरीचे कौतुक साईबाबांनीच यथायोग्य केले. १९८० सालात कोणत्याही प्रकारची गैरहजेरी त्यांचे नावे नमूद केली गेलेली नाही. उत्कृष्ठ काम याबद्दल १९८० चे चांदीचे पदक व प्रशस्तिपत्रक श्री. दाजीबा सावळे यांना देण्यात आले.


# श्रीसाईलीला

## ६० व्या वर्षा निमित्य नवी माहिती पूर्ण लेखमाला

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी येथे संस्थानचे विविध विभाग केवळ भक्तांसाठीच आहेत. या प्रत्येक विभागाचा सर्वांगीण असा स्वतंत्र, संपूर्ण सचित्र परिचय भक्तांना करून देण्याचे ठरविले आहे. या लेखमालेतला पहिला माहिती पूर्ण सचित्र लेख.

**श्रीसाईलीला-एप्रिल १९८१ अंकात वाचा.**

### आमचे समाधी मंदिर

लेखक : सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक श्रीसाईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

# मा. राज्यपाल यांची शिर्डीस भेट

—कु. रेखा दिघे
वरिष्ठ लेखापाल शिर्डी संस्थान

श्री साईबाबा संस्थान शिरडी, हे महाराष्ट्रातील एक अत्यंत नामवंत असे देवस्थान असून भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही अनेक लोक बाबांच्या दर्शनास येत असतात, संस्थानचे उत्पन्न दिवसे दिवस वाढत आहे. माहे जानेवारी १९८१ चे दक्षिणापेटीतील रक्कम एकूण रु. २,८७,६३१।– पहाता, साईबाबा संस्थान किती नांवारूपास आलेले देवस्थान आहे त्याची स्पष्ट कल्पना सहजपणे येते. देवासमोरील पेटीतील हे उत्पन्न आतापर्यंतचे जास्तीत जास्त उत्पन्न होय. महाराष्ट्रातील प्रामुख्याने उल्लेख करण्याजोगे देवस्थान. येथे अनेक प्रकारची, वेगवेगळया जातीचे व धर्माचे, त्याचप्रमाणे सर्व थरातील लोक येतात व भक्तीभावाने बाबांचे दर्शन घेऊन जातात. कोणी मुक्कामास रहातात तर कोणी दर्शन घेऊन मानसिक समाधान मिळवून जातात. अनेक कारणाकरिता, बाबांजवळ मागणे मागायला, तर कोणी देणे द्यायला बाबांच्या चरणी येतात व मनःशांती अनुभवतात. सर्व थरातील व विविध धर्मांचे लोक एकत्र येण्याचे महाराष्ट्रातील हे एकमेव मनःशांती देणारे ठिकाण आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

जिथे श्री साईबाबांचे सतत वास्तव्य, जिथे राहून बाबा सर्व भक्तांच्या अडीअडचणींना धावून जातात, जेथे कायम वास्तव्य करून बाबा लोकांशी बोलतात, त्यांना दुःखातून मार्ग दाखवतात, अशा या संताचे दर्शन घेण्यास दिनांक ३१।३।८१ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. ओमप्रकाश मेहरा शिर्डी क्षेत्री आले होते. मनुष्य कितीही लहान असो, वा मोठा असो, श्रीमंत वा गरीब, प्रत्येकाला आपआपल्या परीने सुख दुःख असतात. कोणाला कमी कोणाला जास्त सुख दुःख सर्वांना सारखेच, फक्त त्याचा प्रकार कमी जास्त असतो. सुखदुःखाची चढउतार ही प्रत्येकाच्या आयुष्यात असते. माननीय राज्यपाल श्री. ओमप्रकाश मेहरा हे देखील अशाच आपल्या सुखदुःखाचा उलगडा करण्यासाठी श्रीसाईबाबांचे चरणी आले होते. श्री. मेहरासाहेब ठीक ११–२० वाजता शिर्डीत आले. त्यांनी मनोभावे श्री साईबाबांच्या समाधीवर अभिषेक केला. नंतर मनोभावे दर्शन घेऊन श्री. मेहरा समाधी मंदिरात दर्शनास बसले. माझी जी काही उज्वल भविष्याकडे

वाटचाल झाली व आज राज्यपाल म्हणून जो बहुमान मला मिळाला व नांवलौकीक मिळाला व आज जे बहुमूल्य असे 'महाराष्ट्राचा राज्यपाल' हे स्थान मला प्राप्त झाले ते केवळ साईकृपेमुळेच अशी त्यांची गाढ श्रद्धा. श्री. मेहरा हे पूर्वीपासूनच साईबाबांचे भक्त असून ते वारंवार शिर्डीस येतात. सर्व गोष्टी, मग त्या चांगल्या किंवा वाईट या फक्त साईबाबांच्या आशिर्वादानेच घडतात, असे श्री. मेहरा यानी साईबाबांवरील नितांत भक्तीनेच सांगितले. श्री. मेहरा यांचे बरोबर त्यांच्या पत्नी सौ. सत्या मेहरा, त्यांचे चिरंजीव कुमार राहुल आणि अविनाश हे-ही साईबाबांचे दर्शनाचा लाभ घेण्यासाठी आले होते.

त्याच प्रमाणे नगर जिल्ह्यातील एम्. पी. श्री. बाळासाहेब विखेपाटील, एम्. एल. ए. श्री. शंकरराव कोल्हे, एम्. एल. ए. श्री अण्णासाहेब मस्के या राजकारणातील प्रतिष्टीत मंडळीची उपस्थित उल्लेखनीय वाटली. श्री. राजाध्यक्ष आय. ए. एस. कमीशनर नासीक डिवीजन, श्री. एस. व्ही. गुप्ते आय. ए. एस. कमीशनर पुणे डिवीजन, श्री अनीलकुमार लखीना जिल्हाधिकारी नगर, श्री. भणगे ऊपविभागीय अधिकारी संगमनेर श्री. धारते तहशिलदार कोपरगाव. तसेच नगर, कोपरगाव, नाशीक पुणे भागातील अनेक इतर सरकारी अधिकारी देखील उपस्थित होते.

श्रीसाईबाबांचे देवस्थान हे सर्व जाती धर्मांना, खुले असून, उच्चनीय असा भेदभाव नाही. हे मा. राज्यपाल यानी दाखवून दिले. ते स्वतः श्रीसाईबाबांच्या धूपारती करीता हजर राहीले. सर्व लोकांच्यात उभे राहून त्यानी सर्वसामान्य माणसासारखेच आरती चालू असताना बाबांचे दर्शन घेतले. त्यातच धन्यता मानली. श्रीसाईबाबा संस्थानतर्फे माननीय राज्यपाल यांना बाबांचा प्रसाद म्हणून एक शाल आणि श्रीफल देण हे अत्यंत ऊचीत होत. संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. काकरे साहेब यानी श्रीसाईबाबांचा आशीर्वाद म्हणून राज्यपालाना शाल अर्पण केली. त्याचप्रमाणे श्रीफळ व प्रसादही दिला. त्याचप्रमाणे त्यांचे दोघेही चिरंजिव कुमार राहुल आणि अविनाश यानाही प्रसाद देण्याची कामगीरी श्री. क. ही. काकरे, कोर्टरिसिव्हर यांनी केली. तसेच सौ. सत्या मेहरा यांचाही योग्य तो सत्कार संस्थानतर्फे करण्यात आला. अशा प्रकारे राज्यपाल श्री. मेहरा बाबांची मनोभावे पूजा करून व श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन, जड अंतःकरणाने १-०० वाजता आपल्या मुक्कामी परतले.

# श्रीसाईलीला—लेखक-कवींचे उत्साहाने साजरे झालेले सातवे स्नेहसंमेलन

— सुभाषचंद्र

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे मुखपत्र असलेल्या 'श्रीसाईलीला' मासिकात लेखन करणाऱ्या लेखक कवींचे सातवे स्नेहसंमेलन शिर्डी क्षेत्री मंगळवार ता. ३ व बुधवार ता. ४ फेब्रुवारी १९८१ रोजी मोठया थाटात अतीव उत्साहाने साजरे करण्यात आले. १९७५ साली लेखक-कवींचे पहिले स्नेहसंमेलन यशस्वीपणे पार पडले होते. यंदाचे हे सातवे स्नेहसंमेलनही उत्साहाने पार पडले. यंदाच्या सोहळयास सुमारे सव्वाशेवर लेखक-कवींचा मेळावा अतिशय आनंदाने दोन-तीन दिवस एकत्र आला. भेटीगाठी झाल्या, मागील जुन्या भेटींना उजाळा आला, नवीन परिचय मैत्री झाली आणि काही साईभक्त साहित्यप्रेमींची दृढमैत्री झाली.

ह. भ. प. श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनी यांच्या इंदूर निवासी सुकन्या सौ. प्रभाताई उर्फ सौ. सरोजिनी भास्करराव मुळये या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होत्या. त्यांचे समवेत त्यांचे पतीराज श्री. भास्करराव मुळये व कन्या कु. लीलाताई या पण हजर होत्या. सौ. सरोजिनीताईंना श्रीसाईनाथांचे दर्शन वयाच्या आठव्या वर्षी घडले होते. त्या बाबांच्या मांडीवर खेळलेल्या आहेत. बाबा त्यांना मोठया लाडीकपणे "मैना" म्हणून हाक मारीत असत.

संमेलनासाठी महाराष्ट्रातील विविध भागातून तसेच दक्षिण भारतातून गुजराथेतूनही साईभक्त लेखक मंडळी आली होती. मुंबईहून साईभक्त डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, डॉ. अण्णासाहेब दाभोलकर, सर्वश्री डी. आर. खडके, माधवराव गोरे, सौ. कलावती चव्हाण, सौ. शांताबाई सरोदे, श्रीराम सातर्डेकर, प्रभाकर कोळमकर, विजय हजारे, एन. जी. परुळेकर, राधाकृष्ण गुप्ता, अनिल रसाळ, दा. र. दळवी, जे. डी. दळवी, सूर्यकांत दळवी, रमाकांत पंडित, श्री. व सौ. शशिकला रेवणकर, डॉ. अ. का. पाठक, श्री. व सौ. बिपिन स्वादिया, विलास पडवळ, सौ. तारा चेंदवणकर, ग. गो. सामंत, लोणावळ्याहून डॉ. सौ. सुमती खानविलकर, राहूल खानविलकर, डॉ. इंदूताई नाईक, श्री. बाळकृष्ण अ. देसाई, पुण्याहून प्रा. र. श्री. पुजारी, श्री. व सौ. निंबाळकर, श्री. रघुनाथ सांडभोर, श्री. डी. एम. मोरे, श्री.

जगन्नाथ कुलकर्णी, श्री. म. द. भिडे, इंदूरहून श्री. व सौ. प्रकाश कर्पे, श्री. व सौ. बापूसाहेब निरखे, श्री. व सौ. लॉरिया, पिंप्रीहून श्री. व सौ. डी. बी. पोतनीस, नगरहून श्री. अ. ब. चितांबर, कोल्हापूरहून डॉ. रा. सी. कापडी, श्री. स. व्यं. कुलकर्णी, नबापूरहून श्री. रमेश चव्हाण, श्री. हसमुख पाटील, श्री. विजय चव्हाण, श्री. शांतीलाल दवे, धुळ्याहून श्री. नागेश मोंगलाईकर, श्री. चारुहास गाळणकर श्री. जगदीश देवपूरकर, सौ. लीलाताई मराठे, वर्ध्याहून श्री. अनिलकुमार लुतडे, बिदरहून प्रा. गुंडेराव पटवारी, चंदीगडहून ॲडव्होकेट श्री. जुगल किशोर पुरी, मद्रासहून श्री. आर. एस. रामकृष्णन, बैतुलहून प्रा. ए. पी. त्रिपाठी, उस्मानाबादहून श्री. ग. दे. कुलकर्णी, गुळूंचेहून प्रिं. अमीनगड, बडोद्याहून श्री. परमानंद टेकचंदानी, खुद्द शिरडीच्याच सौ. उषाताई मुळे व श्रीमती लीलाताई गुजराथी इ. इ. लेखक-कवी मंडळी उपस्थित होती.

मंगळवार ता. ३ रोजी संमेलनाच्या कार्यक्रमास ठीक ९ वा. सुरुवात झाली. गतवर्षीप्रमाणेच लेंडी बागेतील साईनिवासच्या हिरवळीवर बैठक घालून हे संमेलन भरविण्यात आले होते, सुरुवातीस माननीय श्री. काकरे साहेब कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी निमंत्रक या नात्याने सर्वांचे स्वागत करून संमेलनाचे उद्घाटन केले. त्यानंतर श्री. एन. जी. परुळेकर रचित स्वागतगीत श्री.-बाळ चावरे यांनी गाईले. "असो हे स्वागत आज तयांचे शब्द सृष्टीच्या गंधर्वांचे" अशा या स्वागत गीताच्या पहिल्या ओळी होत्या. त्यानंतर ज्ञात्-अज्ञात अशा दिवंगत साई भक्तांना साई लेखक-कवींना मिनिटभर उभे राहून मूक श्रद्धांजली वाहाण्यात आली त्यानंतर संपूर्ण संमेलनाची व दोन दिवसाच्या एकंदर कार्यक्रमाची योजना आणि रुपरेषा कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी सर्वांना स्पष्ट करून सांगितली यानंतर संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा सौ. सरोजिनीताई मुळये यांचा परिचय समर्पक शब्दात इंदूरनिवासी व श्रीसाईलीलाचे एक मान्यवर लेखक श्री. बापूसाहेब निरखे यांनी करून दिला. सौ. सरोजिनीताईना त्यांनीच इंदूरहून अगदी सुखरुपपणे व व्यवस्थित आणण्यास संपूर्णपणे सहाय्य केले होते. अध्यक्षांच्या परिचय कार्यक्रमानंतर श्रीसाईलीला काव्य बहार अंकाचा प्रकाशन समारंभ अध्यक्षा महोदयांच्या शुभहस्ते करण्यात आला व या अंकात ज्यांचे काव्य प्रसिद्ध झाले आहे त्या कवी कवयित्रींना अध्यक्षांचे हस्ते अंकाची भेट प्रत व प्रसादवन पुरस्कार देण्यात आला. सुमारे तीसावर कवी-कवयित्रींना या भेट अंकाचा लाभ प्रत्यक्ष झाला व त्याबद्दल त्यांना धन्यता वाटली. श्रीसाई काव्य बहार अंक हा दरवर्षी संमेलनाचे सुमारासच प्रसिद्ध होत असतो व त्यात प्रामुख्याने श्रीसाईबाबांच्या वरील काव्य, अभंग, पदे,

कविता, गझल इ. प्रसिद्ध केली जातात. गेल्या तीन वर्षापासून अशा प्रकारचा अंक काढण्यास सुरुवात झाली असून या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे व अंकाचे सर्वत्र स्वागतच करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला दरवर्षी साकुरीच्या गोदावरी-माताजी हजर असतात पण यंदा प्रकृतीच्या नरमाईमुळे त्या हजर राहिल्या नाहीत यामुळे सर्वांनाच वाईट वाटले.

या कार्यक्रमानंतर या संमेलनाचा फायदा घेऊन काही साईभक्तांनी आपापले काव्य संग्रह याच सुमारास प्रसिद्ध केले होते व त्यांचे प्रकाशन समारंभही अध्यक्षांचे शुभहस्ते करण्यात आले.

'साईगीतसुधा' हे सुंदर काव्यपुस्तक मुंबईचे श्री. दामोदर रघुनाथ दळवी यांनी तयार केले होते. त्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ प्रथम करण्यात आला. साईभक्त श्री. दळवी हे मुंबईतील पोर्टट्रस्टमध्ये ऑफिस सुपरिंटेंडेटच्या पदावर आहेत. यापूर्वी त्यांनी दोन पुस्तके लिहून साहित्य सेवेत भर घातली आहे. साईगीत-सुधा मध्ये त्यांनी साईगीत अष्टकांची, बाबांच्या जीवनातील काही प्रसंग घेऊन छान-दार रचना केली आहे. या पुस्तकाला का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांची प्रस्ता-वना लाभली असून श्री. काकरेसाहेब, श्री. पाठकसाहेब डॉ. दाभोळकर श्री. विश्व-नाथबाबा पिंगुळकरयांचे शुभाशिष लाभले आहेत.

दुसरे बाबांच्यावरील प्रकाशन जे झाले ते म्हणजे मुंबईचे तरुण व साईभक्त श्री. विजय हजारे यांच्या 'श्रीसाईगीत दरबार' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे. या सुंदर दरबार संग्रहात सुमारे ५० मान्यवर साईभक्तांनी आपापली हजेरी लावलेली आहे. बाबांच्यावरील उत्कृष्ट कवितांचा या पुस्तकात संग्रह-समावेश केलेला अस-ल्याने हे एक मौलीक पुस्तक आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. श्री. विजय हजारे हे मुंबईस ए. सी. सी. मध्ये नोकरीस आहेत.

श्रीसाईबाबांच्यावरील जगातील पहिली आंग्ल कादंबरी लिहिली गेली आहे. त्या कादंबरीचे नाव आहे 'दि मिशन डिव्हाइन'! या रसाळ कादंबरीचे लेखक आहेत श्री. रघुनाथ शंकर जुन्नरकर मुंबईचे हे साईभक्त एकाकाळी चित्रपट क्षेत्रात वावरत होते. त्यांनी 'मशिदीत प्रगटला परमेश्वर' ही साईबाबांच्या जीवनावरील सुंदर सोप्या भाषेत व लालित्यपूर्ण अशी कादंबरी लिहिली आहे. त्या कादंबरीचेच इंग्रजीत रूपांतर त्यांनी वरील शिर्षकाखाली केले व ती कादंबरी गुढीपाडव्याच्या

सुमुहूर्तावर दादरच्या साईनिकेतनमध्ये डॉ. श्री. दि. परचुरे यांचे शुभहस्ते प्रकाशित केली होती. संमेलनात ही कादंबरी साईभक्तांना दाखविण्यात येऊन त्या कादंबरीचा गौरवही करण्यात आला व श्री. जुन्नरकर यांनीही या संबंधात त्याबद्दल आटोपशीर असे निवेदन पण केले. श्री. दळवी व श्री. हजारे यांनाही आपापल्या पुस्तकासंबंधी अल्पसे निवेदन करण्यास संधी देण्यात आली होती. या कार्यक्रमानंतर श्री. हजारे यांनी आपल्या दरबाराच्या प्रती उपस्थित कवींना अध्यक्षांचे हस्ते भेटी दाखल दिल्या.

या प्रकाशन समारंभानंतर उपस्थित साईभक्तांनी आपापला परिचय करून दिला तो पर्यंत सव्वा बारा वाजले. नंतर सर्व मंडळी श्रींच्या आरतीसाठी गेली. पुढे आरतीनंतर प्रसादग्रहणासाठी नव्या भोजन गृहात सर्व्यांना नेण्यात आले. तो पर्यंत दिड वाजून गेला. पुढे अल्प विश्रांती देण्यात आली व ३-३० वाजता संमेलनाचे दुसरे सत्र सुरू झाले.

दुपारचे अधिवेशन ठीक वेळेवर सुरू झाले. यावेळी श्रीसाईलीला मासिकाच्या विकासाच्या दृष्टीने सूचना करण्यात आल्या होत्या. त्या सूचनांवर साधक-बाधक चर्चा अशी काही त्यावेळी झाली नाही. श्रीसाईलीला लेखक-कवींनी ज्या सूचना सादर केल्या त्यांचा नामनिर्देशासह तपशील थोडक्यात असा—

प्रथम चेंबुरचे साईभक्त भारत सरकारच्या गुप्तहेर खात्यातील प्रख्यात सेवानिवृत्त अधिकारी श्री. डी. आर. उर्फ श्रीसाईनाथ खडके यांनी तीन सूचना सादर केल्या.-

१) श्रीसाईलीला हे मासिक चालू आहे की नाही हे अद्याप पर्यंत अनेक भक्तांना माहित नाही. तसेच संस्थानची कोणकोणती प्रकाशने आहेत हे पण अनेकांना माहित नाही. त्यासाठी समाधी मंदिराच्या आसपास किंवा आपल्या मुख्य कचेरी समोर आपल्या प्रकाशनांचा एक चांगला स्टॉल असावा त्यामुळे संस्थानची प्रकाशने व मासिके, श्रीबाबांची छायाचित्रे याबद्दलची विक्री अधिक जोरदारपणे करता येईल.

२) गेल्या वर्षीच्या अर्जामध्ये "आणखीन एका व्यक्तीस आणावे" अशी नोंद होती व त्यामुळे गेल्या वर्षीच्या संमेलनाच्या वेळी बहुसंख्य सभासदांनी अत्यंत नाराजी व्यक्त केली होती आणि त्यावेळी असे यापुढे होणार नाही हेही स्पष्टीकरण संस्थानतर्फे करण्यात आले होते.

असे असूनही या वर्षीचे फॉर्ममध्ये पण तीच नोंद म्हणजे "आणखीन एका व्यक्तीस आणावे" अशी होती. ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. अशी नोंद यापुढे

तरी नसावी. फार तर संस्थानने मोफत जेवणाखाण्याची व्यवस्था बंद करावी. त्या ऐवजी जागेची अडचण असल्यास " प्रत्येक सभासदास एकच खोली देण्यात येईल" अशी नोंद असावी.

३) या संमेलनास हजर राहण्याकरिता पात्र असे लेखक वा कवी कोण याची व्याख्या अलीकडे दरवर्षी बदलत आहे. यावर्षी लायक अथवा पात्र अशा लेखक वा कवींची व्याख्या, "गेल्या ५ वर्षांत ज्यांचे तीन लेख श्रीसाईलीला मासिकात प्रसिद्ध झाले" अशी करण्यात आली व ती व्याख्या जानेवारी १९८१ चे अंकात अर्जांचे फॉर्ममधे समाविष्ट करण्यात आली अशा रितीने लेखक कवींना एकदम आश्चर्याचा धक्का देण्यात येतो व आपल्या पात्रतेबद्दल त्यांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. ही प्रथा योग्य नाही.

लेखक अगर कवींच्या पात्रापात्रतेबद्दलचा निर्णय यावर्षी या संमेनात घेतलाच जावा, आणि हा अधिकार यापुढे या संमेलनाच्या अनुभवानेच घेतला जावा.

**२) श्री. प्रकाश प्र. कर्पे, इंदूर**

सूचना नं. १. वर्गणी संपल्याची सूचना मासिकाच्या रॅपरवर मोहर (सील) लावून दिली जाते. कधी कधी रॅपर इकडे तिकडे ठेवण्यात आले की, केव्हा वर्गणी संपली, हे कळायला मार्ग नसतो. (जर याबद्दल पूर्वी नोंद करून ठेवली नसेल तर) जर रॅपरवर सील लावण्या बरोबर मासिकांच्या कव्हरवर किंवा आतल्या पानावर ही सीले लावली तर उत्तम राहील.

सूचना नं. २. श्रीसाईलीला मासिक फक्त इंग्रजी व हिन्दी अशा २ आवृत्त्या मध्ये प्रकाशित होते. हिन्दी सारख्या राष्ट्रभाषेला इंग्रजी आवृत्तीमध्ये फार कमी पाने दिली गेली आहेत. माझ्या मते हिन्दी आवृत्ती काढायला पाहिजे किंवा कमीत कमी पाने तरी वाढवायला पाहिजे. श्रीसाईलीला अंक हा सर्वदूर लोकप्रिय व्हावा, ही माझी मनापासून इच्छा आहे. वरील सुझावाबरोबर खालील २ सुझावावर ही विचार करावा.

(अ) मासिकांच्या आवृत्त्या कितीही असल्या तरी त्यात प्रकाशित होणारी सामुग्री एकच असावी. म्हणजे मराठी लेखकांचे अनुभव इंग्रजी–हिन्दी आवृत्तीचे सदस्य ही वाचु शकतील. (पद्य सामग्री सोडून) उदा–शिरडी वृत्त माहे... हिन्दी

इंग्रजी–मराठी आवृत्तीमध्ये एकसारखे असते. मराठी चांदोबाच्या वेगवेगळ्या आवृत्या असल्यातरी सामुग्री एकच असते.

(ब) जर सामुग्री एक ठेवणे शक्य नसेल तर एकाच मासिकात अलग २ भाषेसाठी अलग अलग पाने असावी ( लोकप्रियते–प्रमाणे ) यामुळे सदस्यांना वेग-वेगळ्या भाषेतल्या लेखकांचे अनुभव वाचायला मिळतील. पुढे मागे जर मागणी आली तर दुसऱ्या भाषांनाही यात जागा मिळू शकते.

३) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुंबई

सूचना नं. १. साईलीला मासिक जानेवारीपासून कव्हरमधून येऊ लागले, याबद्दल व्यवस्थापकांचे हार्दिक अभिनंदन. मात्र अंक पोस्टात पोस्ट केल्याची तारीख अजूनही अंकाच्या कव्हरवर नसते. त्यामुळे अंक उशीरा मिळाल्यास पोष्टात तक्रार करणे कठीण जाते. तेव्हा ज्या दिवशी अंक पोस्ट केला जातो त्या दिवसाची तारीख कव्हरवर असावी.

सूचना नं. २. तसेच जानेवारी १९८१ च्या साईलीलाच्या मलपृष्ठावर आपण सम्मेलनाचा तक्ता भरून पाठविण्यास सांगितले आहे. म्हणजे मलपृष्ठ फाडून पाठविण्यास सांगितले आहे हे बरे दिसत नाही. तरी या पुढे साईलीलाचे एक पान ( स्वतंत्र ) याकरिता उपयोगात आणणे बरे दिसेल.

४) श्री. रमेश डी. चव्हाण नवापूर.

सूचना १. श्रीसाईलीला मासिकाच्या सजावटीत अंर्तबाह्य सुधारणा झाल्याने प्रथमतः मनःपूर्वक धन्यवाद.

सूचना २. श्रीसाईलीला मासिकाची वर्गणी भरून सुद्धा लागोपाठ दोन तीन महिने अंक मिळत नाही. पत्रव्यवहार करून साधे उत्तरही मिळत नाही. वर्गणीदारांना अंक मिळायलाच पाहिजे. अशी व्यवस्था व्हावी. मला ऑगस्ट ८०, सप्टेंबर ८०, जानेवारी ८१ अंक मिळाले नाहीत.

सूचना ३. वर्गणीदारांना ज्या महिन्यापासून वर्गणी भरली असेल त्याचप्रमाणे अंक पाठविण्यास पाहिजे. या वर्षी वर्गणी भरताना मी स्पष्टपणे जानेवारी ८१ पासून

वर्गणीदार होत आहे असे लिहूनही मला ऑक्टोबर ८० पासून वर्गणीदार करून ऑक्टोबरचा अंक पाठविला. जानेवारी ८१ चा अंक मिळाला नाही,

सूचना ४. दर महिन्याला अंक साधारणपणे पहिल्या आठवड्यात मिळायला पाहिजे, असे पाठवावे. १४ जानेवारी उलटूनही अद्यापी जानेवारी ८१ चा अंक मिळाला नाही.

सूचना ५. लेखक कवि संमेलनासाठी छापील तक्ता भरून पाठविण्याविषयीचा उल्लेख आहे. १७ जानेवारीच्या आत मिळावयास पाहिजे असा उल्लेख आहे. परंतु अंक नसल्याने लेखक कवी मुदतीत तक्ता पाठविणार कसा ?

सूचना ६. काही लेखक कवी वर्गणीदार नसतात अशाना संमेलनाच्या तारखा ठाऊक नसतात. तरी आपण साईलीलाकडून ज्या लेखक कवींना बोलवायचे असेल त्यांना निमंत्रण देण्याची प्रथा सुरू करावी.

सूचना ७. संमेलनास येणाऱ्या लेखक कवींनी किती व्यक्ती बरोबर आणाव्यात ही जाचक अट रद्द करावी.

सूचना ८. लेखक कवींची संख्या जास्त वाटत असल्यास किमान ११ वेळा किंवा २५ वेळा साहित्य साईलीलात प्रकाशित झाल्याची अट घालावी किंवा कितीवेळा साहित्य आले ते अजिबात रद्द करावे,

५) श्री. **सदाशिव व्यंकटेश कुलकर्णी**, कोल्हापूर

सूचना १. श्री साईलीला मासिकाच्या सुरुवातीपासून आतापर्यंतच्या सर्व अंकाचे एकत्रीकरण करून खंड रूपाने प्रसिद्ध करण्यात यावे, श्री साईचरित्राशिवाय साईभक्तांनी साईलीलेतील प्रसिद्ध केलेले अनुभव जिज्ञासू साईभक्तांना वाचनालयास मिळतील यासाठी ही सूचना केली आहे, हे एकत्रीकरण करीत असताना श्री साईसच्चरित्रात किंवा श्री साईबाबांचे इतर अधिकृत ग्रंथात (संस्थानने प्रकाशित केलेले) आलेल्या अनुभव कथा किंवा बोधकथा वगळण्यात याव्यात. तसेच अंकातील इतर नित्य नैमत्तिक व प्रासंगिक माहिती वगळणेत यावी. या संमेलनाचे कामासाठी जरूर तर एक समिती नियुक्त करण्यात यावी. याकामी जरूर वाटल्यास आर्थिक सहाय्यासाठी साईभक्तांना आवाहन करण्यात यावे.

६) श्री. गजानन कृष्णराव निरखे, इंदूर.

सूचना १. श्री साईबाबा शिरडीचे असंख्य भाविक भक्त आहेत. त्यात हिंदी भाषिक भक्तांचा भरणा अधिक आहे. मध्यप्रांतात अनेक साईमंदिरातून श्रीसाईलीला हिंदी आवृत्ती काढावी अशी विनंती व विचारणा होत आहे. करिता स्वतंत्र हिंदी श्रीसाईलीला अथवा मराठी मासिकासमवेत हिंदीचे अधिक पृष्ठ जोडावे. इंग्रजी मासिकासमवेत नाही. कारण अनेक भक्त ( हिन्दी ) इंग्रजीचे कमी जाणणारे असतात म्हणून हा प्रस्ताव.

७) श्री. अनिलकुमार बी. लुतडे, वर्धा.

सूचना १. वैदर्भीय साहित्यीककवि लेखकांना प्राधान्य द्यावे.

सूचना २. हिन्दी अंक हा वेगळा काढावा.

सूचना ३. सदरहू संमेलन मार्चमध्ये भरविण्यात यावे., व या संबंधी वेगळा पत्रव्यवहार करण्यात यावा कारण श्रीसाईलीला मासिकामध्ये या संबंधी वितरण दिले जाते व कधी हा अंक हाती लागतो वा उशीरा लागतो वा मिळत नाही. तेव्हा ह्या संबंधी १ महिना अगोदरच माहिती पाठवावी.

सूचना ४. पृष्ठसंख्या वाढवून काव्य विभाग काढावा.

८) श्री. जे. डी. दळवी, मुंबई.

सूचना १. श्रीसाई संस्थानतर्फे वृद्धाश्रम चालवावा संस्थानतर्फे शिर्डीला जमीन विकत घ्यावी आणि त्यावर डबलरूमच्या बैठ्या चाळी बांधाव्या भक्तांकडून काही ठरावीक रक्कम घेऊन पतीपत्नीच्या हयातीपर्यंत त्यांच्या नावे खोली तात्पुरत्या मालकी हक्काने किंवा भाड्याने द्यावी.

तेथेच एक कँटीन भोजनगृह असावे. किंवा आजच्याच भोजनगृहातून सवलतीने भोजन सोय व्हावी. ज्यांना इच्छा असेल त्यांना घरीच स्वयंपाक करण्याची सोय असावी.

ज्यांना गरज असेल त्यांना माफक दरात नोकरवर्ग असावा. वृद्धांना मोफत औषधोपचाराची सोय व्हावी. किंवा दर महिना ठरावीक रक्कम घेवून वरील सुखसोई उपलब्ध व्हाव्यात.

डी. बी. पोतनीस, पुणे.

सूचना १. स्नेहसंमेलन आनंदात, स्नेहभावनेत साजरे व्हावे. कोणाही व्यक्तीने त्यांचा गैरसमज होऊन आनंदी वातावरण गढूळ होऊ देऊ नये ही विनंती.

सूचना २. स्नेहसंमेलनासाठी जमलेल्या लेखक कवीने जर काही कमीजास्त णात गैरसोय झाली तर कृपा करून माननीय श्री. क. हि. काकरे, कोर्टरिसिव्हर ा समक्ष भेटून निवेदन करावे. त्याबाबत मागाहून पत्रव्यवहार करून संस्थानचे क वर्गाबाबत किंवा स्नेहांकिताबाबत कळवू नये.

सूचना ३. श्री साईलीला मासिकांसाठी गद्य किंवा पद्य पाठविले जाते. ते प्रसंगानुचित असेल तर त्वरित प्रसिद्धी दिल्यास लेखकाला बरे वाटेल. उदाहर- ी प. पू. राधाकृष्ण स्वामी यांचे प्रथम स्मृती दिनानिमित्त दि. १२-१२-८० कविता " या भक्तांचा तुला दंडवत " पाठविली तिला प्रसिद्धी नाही.

सूचना ४. गतवर्षाप्रमाणेच स्नेहसंमेलन प्रसंगी जमलेल्या लेखक कवी यांचे नेत प्रमुख पाहुणे, संपादक, कार्यवाह व कार्यालयाचे सेवकवर्ग यांचेसह एकत्रित ापान भोजन प्रसाद मिळावा.

) श्री. प्र. गो. कोळमकर, मुंबई.

सूचना १. श्री साईभक्त कवी लेखक कलाकारांच्या कुटुंबियांना श्री बाबांच्या र्डी क्षेत्री आगावू आठ दिवस अगोदर कळविल्यास " साईनिवास " येथे किंवा य ठिकाणी राहण्यासाठी सोय करावी.

सूचना २. श्री साईमय कवी लेखक कलाकारांच्या कमीत कमी ५० टक्के गुण ठवून उत्तीर्ण होणाऱ्या मुलांना " श्री साईबाबा संस्थान " तर्फे उत्तेजनार्थ पुस्तक आणि शाळा कॉलेज शिक्षण खर्च औदार्याने मंजूर करावा.

सूचना ३. श्री बाबांच्या समाधी दर्शनाची वेगळी व्यवस्था साईमय कवी ाक कलाकारांसाठी करावी.

सूचना ४. साईमय कवी लेखकांबरोबरच साईभक्त गायक कीर्तन प्रवचन ाकारांचेही स्नेहसंमेलन भरवावे. यातून उत्कृष्ट कलाकृती निर्माण करणाऱ्या कला-

कारांना वैयक्तिक पारितोषिके द्यावीत. यातून उत्कृष्ट कलाकृती निर्माण करणा- कलाकारांना " श्री साई भक्ती लीले "चा जगभर प्रसार प्रचार करण्यास प्रवृ- पाठवावे.

११) श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणे.

सूचना १. श्रीसाईलीला मासिक दरमहा दिनांक १६ चे आत वाचकांचे- मिळावे ( यावेळी मासिक १६–१७ तारखेस मिळाले. त्यामुळे संमेलनाची सू- मिळून आपणासी पत्रव्यवहार करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही.

सूचना २. साईलीला मासिकातील जुन्या अंकामधून ( १९५०–५५ ) का- चांगले लेख आहेत. ते नविन वाचकांसाठी पुर्नमुद्रीत करून मासिकातून छापावेत.

सूचना ३. स्नेहसंमेलन शनिवार–रविवार धरून ठेवल्यास येणाऱ्या लोका- रजेचा त्रास होणार नाही.

सुचना ४. संमेलनाच्या दोन दिवसांचा कार्यक्रम ठेवून तीसरे दिवशी सका- समारोप ठेवावा व दुपारी भोजनप्रसाद देऊन सर्वांना निरोप द्यावा.

सूचना ५. संमेलनात भाग घेणारास भोजन प्रसाद निवासस्थानी दिला जा- ती पद्धत बंद करावी. सर्वांना भोजनगृहातच सर्वांबरोबर भोजन प्रसाद देण्यात या- यामुळे सेवकवर्गास होणारा त्रास व भोजन प्रसादाचा लाभ सर्वांबरोबर न घेतल्या- होणारी चर्चा होणार नाही.

सूचना ६. संमेलनास बऱ्याच भगिनी हजर रहातात, व सहभागी होता- संमेलनात होणारे तिळगुळाचे समारंभाचे वेळी त्या भगिनींची खणा नारळाने ओ- भरावी.

सूचना ७. साईलीला मासिकात आध्यात्मिक तात्वीक चिंतन असणारे लेखा- प्राधान्य देण्यात यावे.

१२) श्री. राधाकृष्ण गुप्ता चेतन, डोंबिवली.

प्रस्ताव १. प्रस्ताव में बंधन गति को रोकता है उदाहरण के तौर पर- चैतन्य महाप्रभुका जीवन देखे तो कृष्णभक्ति के प्रसार में प्रभुने नगर नगर न-

र्तन की प्रणाली अपनाई थी उसके नाम संकीर्तन को उस समय के काझी मुसल· तक बंद नहीं सके हरिभक्ति की अखंड धारा अति तीव्र गति से वैसी ही ती रही जिसका परिणाम स्वरूप आजभी नाम संकीर्तन नगर नगर शहरों देहातों होते दिखाई देते है।

प्रस्ताव २. पिछली सम्मेलन मे हिन्दी के पृष्ठों की संख्या पर जोर दिया गया , जिसका नतीजा आज हिन्दी का साहित्य १६ पृष्ठों में प्रकाशित होता है। न्दी में साईलीला की मांग चारों तरफ से आ रही हैं। योग्य सम्पादक के लिये मैं ल्याण के बिर्ला कॉलेज के रिटायर्ड प्राध्यापक श्री. एस. पी. सिंहजी का नाम सूचित रूंगा। उन्होंने हिन्दी में काफी लेखन किया है। वे एम. ए. (इंग्लिश-हिन्दी में) । वे शहद में रहते है। यदि आप उन्हे संमेलन में शामिल होने के लिये आमं· त करे तो मैं उनसे आने की प्रार्थना करूंगा। मेरे विचार से एप्रिल ८१ से अलग हिन्दी साईलीला का प्रकाशन हो जाये तो साई भक्ती का प्रसार पूरे भारत में फैल एगा। हिन्दी राष्ट्रभाषा होने के कारण हिन्दी साईलीला निकालना यह न्यायसंगत । इसपर आप सम्मेलन में जरूर विचार करेंगे।

## ३) श्री. डॉ. अ. का. पाठक, मुंबई.

सूचना १. श्री साईलीला मासिकाचे ७ वे लेखक कवि संमेलन असा ठराव र्व मान्य करते की, श्री साईलीला मासिकाचा आक्टोबर बाल विशेषांक खरो· खरीच कौतुकास्पद होता हे ७ वे स्नेहसंमेलन मा. संपादक व मा. कार्यकारी संपादक यांचे सर्वानुमते अभिनंदन करत आहे आणि बाल लेखकांचे कौतुक नमूद करत आहे. अशा तऱ्हेने विशेषांक श्री साईलीलाने पुढेही प्रकाशित करावे असे आवाहन सर्वानुमते करीत आहे.

सूंचना २. श्री साईलीला मासिकाचे ७ वे लेखक कवी संमेलन असा ठराव सर्वमान्य करते की, सद्गुरू श्री साईनाथांचा संदेश जास्तीत जास्त साईभक्तांकडे पोहोचविण्याच्या दृष्टीने सुप्रसिद्ध श्री साईलीला मासिकाची राष्ट्रभाषा हिन्दीमध्ये आवृत्ती प्रसिद्ध करावी. म्हणून हे ७ वे संमेलन मा. संचालक, श्री साई संस्थानला सर्वानुमते ह्या ठरावाद्वारे नम्र आवाहन करीत आहे.

## १४) श्री. विजय दत्तात्रय हजारे, मुंबई.

सूचना १. संमेलन शनिवार-रविवार अथवा इतर सुट्यांना जोडून ठेवावे म्हणजे एखाद दुसरा दिवस ऑफिसमधून रजा घेऊन मोठ्या आनंदाने सहजपणे

आमच्यासारख्या नोकरवर्गीय ( ऑफिस वर्कर्स ) साईभक्त कवि-लेखकांना संमेलना हजर राहाता येईल.

सूचना २. तीन लेख कवितांचे बंधन तसेच सोबत एकच व्यक्ती आणावया अट नसावी. शिवाय गेले पाच वर्ष संमेलनास हजर राहून संमेलनाची रंगत वा विणाऱ्या ढोलकीपटू आप्पासाहेब सामंत, भैरवी गायक कवी यांनाही आमंत्रित करा

आमच्यामुळे (संमेलनास उपस्थित होणाऱ्यांमुळे) इतर भक्तांची गैरसो होणार असे वाटत असल्यास आमच्यासाठी ठराविक जागा (खोल्या) ठेवल्या आम्ही आपसात सोय करू नी तेवढ्यात आमची सर्वांची सोय करू शकू किंवा इ भक्तांप्रमाणे आपल्याकडून भाडे वगैरे घेतल्यास तेही करू शकू. तेव्हा फक्त जाग रिझर्वेशनचीच संस्थानला सोय करावी लागेल. मला वाटते तेवढे सहज शक्य आहे

## १५) सौ. उषाताई प्रभाकर मुळे, शिरडी.

सूचना १. श्रीसाईसच्चरित मध्ये श्रीसाईबाबांनी भक्तांना वेळोवेळी बहुमोल उपदेश केला तो सोप्या भाषेत स्पष्ट करावा.

सूचना २. श्रीसाईबाबांची भिक्षा वृत्ती व साधेपणा यावर थोडक्यात माहिती देत जावी.

सूचना ३. श्रीसाईलीलेत शक्य तो श्रीसाईबाबा व शिर्डी याबद्दल जास्तीत जास्त माहिती असावी.

सूचना ४. संमेलनाच्या वेळी फक्त काव्य बहार अंक प्रसिद्ध होतो परंतु लेखकांच्या काही निवडक लेखांचा संग्रह करून तो संग्रह संमेलनाच्या वेळी जरूर प्रसिद्ध करावा. त्यामुळे लेखकांनाही जरा दिलासा मिळेल.

## १६) श्री. रघुनाथ श्रीपाद पुजारी, पुणे

सूचना १. श्रीसाईलीलेच्या कवींनी केवळ काव्य न लिहिता संतविषयक त्यातूनही श्रीसाईनाथ विषयक गद्यलेखन मधून मधून करावे व ते श्रीसाईलीलेकडे पाठवावे.

सूचना १. शिकावू किंवा होतकरू गद्यलेखकाना मार्गदर्शक असे एक छोटेसे वर्कशॉप मूळ संमेलनाचा एक भाग म्हणून घेतले जावे.

१७) श्री. जगदिश देवपूरकर, धुळे.

सूचना १. साईसाहित्य संमेलनाची सुरुवात अध्यक्षांच्या हस्ते ज्योत पेटवून करावी..

सूचना २. प्रथम दिवशी रात्री दरबारात ही रात्र साईभक्तांची हा कार्यक्रम काव्य वाचन व गायनाच्या रूपाने ठेवावी.

सूचना ३. साई श्रद्धा व समाज ह्या विषयावर परिसंवाद ठेवावा.

सूचना ४. श्री साईलीला वाचक चळवळ सुरू करावी.

सूचना ५. श्री साई अनुभव कथाकथन हा कार्यक्रम गावागावातून सुरु व्हावा.

सूचना ६. आंतरराष्ट्रीय अपंग वर्षानिमित्त संस्थानने बालिकाश्रम, अनाथाश्रम यासारखा एखादा नवीन उपक्रम हाती घ्यावा.

१८) सौ. शशिकला रामकृष्ण रेवणकर अंबरनाथ.

सूचना १. प्रत्येक वर्षीचा पुण्यतिथी दसरा विशेषांक हा खास मुलांच्यासाठीच असावा. व तसेच त्यांनाही काहीतरी प्रसाद म्हणून मिळावा.

सूचना २. लेखक कवी संमेलनाच्या वेळी बाल साईभक्त साहित्यिकांनाही शिर्डीस येण्याचे प्रयोजन करावे. कारण श्री बाबांना मुलांची खूप आवड होती. तसेच मुलांनाही बाबांचेविषयी किती कसे काय प्रेम भक्ती आहे व ती ते कशा रीतीने व्यक्त करतात हे समजेल व त्याच्यातील बाल साहित्यिक हा मुळापासून भक्कम बनून पुढे मोठा बनू शकेल.

सूचना ३. स्नेहसंमेलनाविषयीचे निवेदन दिवाळी अंकातच द्यावे. कारण जानेवारी अंक हा लेट मिळाल्यावर पत्रोत्तर करून निमंत्रण कार्ड मिळवणे मुदतीबाहेर जाते, व निराशा पत्करावी लागते.

सूचना ४. लेखक कवीचे स्नेहसंमेलन हे खरे म्हणजे फक्त स्नेहाचे ;प्रेमाचे नाते जोडणारे टिकवणारे व साईभक्तांचे ऐक्य प्रस्थापित करणारे असते. तरी सर्वांनी तशाच मुद्यातून वागावे, व मुख्यतः वरीष्ठ संपादकांनी त्याच योजनेतून आपल्या लेखक कवींना प्रेमाचे आग्रहाचे निमंत्रण द्यावे. उगीचच जास्तीत जास्त नियम व अटी घालून मनामध्ये नाराजी निर्मू नये. प्रेमानेच प्रेमाची उत्पत्ती करावी व पुढील वर्षाच्या भेटीची संमेलनाची जास्तीत जास्त उत्सुकता ठेवावी.

संमेलन पुन्हा एकदा मध्ये केव्हातरी साजरे व्हावे. निदान साठाव्या वर्षानिमित्य साईभेटीची ही तळमळीची इच्छा.

१९) सौ. लीला डी मराठे, धुळे.

सूचना १. साईभक्ती प्रचार हे माध्यम आहे व त्यासाठी नवीन श्रीसाईलीला मासिक वर्गणीदार यांना संमेलनात सहभागी होण्याविषयी व दोन शब्द बोलण्यास मिळावे ही नम्र विनंती.

२०) ले. कर्नल श्री. निंबाळकर, पुणे

सूचना १. शिरडीवृत्त वेळच्या वेळी देण्यात यावे व अंक दरमहा वेळीच मिळत जावा.

२१) श्री. हसमुख ओंकार पाटील, नवापूर

सूचना १. इंग्रजी आवृत्तीत हिंदी मजकुराला आणखीन पाने वाढवावीत. तसेच मराठी अंकातील शुद्धलेखनाकडे लक्ष पुरवावे.

२२) डॉ. रा. सी. कापडी, कोल्हापूर

सूचना १. दिवाळी अंकात ज्याप्रमाणे प. पू. नानामहाराज तराणेकर इंदूर यांचा परिचय करून दिला होता तशा प्रकारचे अन्यसंतांचे परिचय श्रीसाईलीला मधून दिले जावेत.

२३) श्री. बिपीन स्वादिया, मुंबई

सूचना १. श्रीसाईलीलाची आंतर बाह्य सजावट आता तर खूपच चांगली झाली आहे. ती आणखीन चांगली व्हावी यासाठी काही चित्रकारांच्या कडून बाबांच्या संबंधीची चित्रे काढवून घेऊन त्या चित्रांचे ठसे अंकातून मुखपृष्ठावर द्यावेत. चित्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार पण द्यावेत.

सूचना २. मुंबई ते शिर्डी अशी थेट गाडी असणे आवश्यक आहे त्यासाठी प्रयत्न केले जावेत.

२४) श्री. नागेश मोंगलाईकर, धुळे.

१. श्रीसाईलीला साठाव्या वर्षाच्या निमित्ताने समस्यापूर्ती स्पर्धा ठेवावी, व वर्षाच्या शेवटी सुंदर समस्यापूर्ती काव्याला पुरस्कार द्यावा–' आणि जाहली ही साठ वर्षांची साईलीला ' समस्यापूर्तीचे चरण त्यांनी असे सांगितले.

२. श्रीसाईलीला अंक आता पिशवीतून पाठविण्याची सोय झाली आहे. अंकाचा गेट अप पण छान झाला आहे याबद्दल धन्यवाद.

३. श्रीसाईलीलेने विदर्भ-मराठवाडा व मध्यप्रदेशातील लेखक-कवींची पण दखल घ्यावी.

२५) श्री. टेकचंदानी परमानंद, बडोदा.

१. श्रीसाईबाबांच्यावर आतापर्यंत प्रकाशित झालेल्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी इ. भाषातील पुस्तकांची एक सूची तयार करून ती प्रकाशित करावी यामुळे सर्वसामान्य वाचकास बाबांच्यावरील पुस्तकांची माहिती होईल.

२. भारतातील श्रीसाई मंदिरांची एक सूची प्रकाशित करून तिथे असलेल्या विश्वस्त मंडळींची नावे पण जाहीर करावीत.

श्री. एन. जी. परुळेकर, सौ. खानविलकर, श्री. सुब्बाराव हैद्राबाद इ.नी पण सूचना मांडल्या.

दुपारच्या या सत्रात एकूण २५ साईभक्तांनी अशा विविध सूचना मांडल्या. सव्वा सहा वाजेपर्यंत हा भाषणांचा कार्यक्रम आटोपला. पुढे श्रींची आरतीसाठी भक्त मंडळी गेली व त्यानंतर प्रसादग्रहणाचा कार्यक्रम झाला. श्रींच्या दरबारात अनेकांनी ८·३० ते १० वाजेतोपर्यंत हजेरी लावली व त्या कार्यक्रमाचे संचलन श्री. जगदीश देवपूरकर यांनी यशस्वीपणे केले.

बुधवार दि. ४ रोजी सकाळी लेखक–कवींनी आपापले काव्य साहित्य मंडपात गाऊन दाखविण्याची परवानगी न्यायालय धारक साहेबांकडे मागितली व ती त्यांना त्यांनी दिली. सकाळी ९ ते १२–१५ वाजेतोपर्यंत मंडपात झालेल्या या बहारदार कार्यक्रमाची रंगत ती काय वर्णावी ! अनेकांनी बाबांवरील छानछान गीते, गझल, अभंग पदे इ. गाऊन दाखविली. सर्वश्री. नागेश मोगलाईकर, प्रकाश कर्पे, र. श्री. पुजारी

हसमुख पाटील, चेतन, सांडभोर, लीला गुजराथी, ए. पी. त्रिपाठी, विजय हजारे, मधुकर मंडलीक, लुतडे, जे. के. पुरी, जगदीश देवपुरकर, रमेश चव्हाण, डी. बी. मोरे, डी. बी. पोतनीस, सौ. लीला मराठे, डॉ. सुमती खानविलकर, डॉ. इंदू नाईक, एन. सौ. पल्लेकर, सौ. शशीकला रेवणकर, गुंडेराव पटवारी, जगन्नाथ कुलकर्णी, डॉ. कानडी, कुमार राहुल खानविलकर, र. शं. जुन्नरकर, सौ. लता पाटील, निवृत्ती हणमंत पाटील, विजय चव्हाण, जे. डी. दळवी, विलास पडवळ, अनिल रसाळ, सौ. कलावती चव्हाण, स. व्यं. कुलकर्णी अशा एकंदर ३४ मंडळींनी या सकाळच्या कार्यक्रमात भाग घेतला.

या कार्यक्रमानंतर श्रीसाईलीला मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी भक्तमंडळींनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना थोडक्यात पण मुद्देसूद अशी उत्तरे दिली. अंक दरमहा वाचकांना उशिरा कां मिळतात याचेही त्यांनी निराकरण केले. लेख वा काव्य मासिकाकडे पाठविताना कशा पद्धतीने दक्षता घेतली पाहिजे याबद्दल सांगताना ते म्हणाले की लेख थोडक्यात व आटोपशीर असावा. संतांची छायाचित्रे पण संत विषयक लेखाबरोबर पाठवावीत, लेख वा कविता विषयाला धरून असाव्यात असे साहित्य चटकन पसंत पडते व ते छापण्यास सुलभ होते.

दुपारी ३–३० वाजता चौथे व शेवटचे सत्र सुरू झाले हे सत्र सुरु होण्याच्या सुरुवातीसच मूर्तिजापूरहून विद्यमान संत श्री. प. पू. पुंडलिक बाबा यांची एक भव्य सुंदर तसबिर पुंडलिक बाबांचे बंधू श्री. नारायण खंडूजी पातोंड हे घेऊन आले होते व त्यांनी ती महाराजांची जंगी तसबिर संस्थानला भेटी दाखल अर्पण केली तिचा स्वीकार श्री. काकरे साहेबांनी आदरपूर्वक केला.

या कार्यक्रमानंतर साकोरीच्या श्री उपासनी कन्याकुमारी आश्रमाचे प. पू. गोदावरी माताजींचे चिटणीस व व्यवस्थापक डॉ. शांताराम टिपणीस यांनी माताजींचा शुभाशिष प्रदान करणारे भाषण केले. पुढे संमेलनाच्या अध्यक्षा सौ. सरोजिनी मुळये यांनी भाषण केले ते असे.—

# साईभक्त सौ. सरोजिनी मुळये–अध्यक्षीय भाषण

श्रीमान काकरे साहेब, संपादक वर्ग आणि उपस्थित साई बंधु-भगिनींनो नमस्कार. आज "श्रीसाईलीला" मासिकाच्या लेखक कवींशी परिचय झाल्याचा, त्यांच्यासोबत दोन दिवस विचार विनिमय करण्याची संधी लाभल्याचा मला फार

फार आनंद होत आहे, खर म्हणजे, मी लेखकही नाही आणि कवयित्री पण नाही, तरी सम्मेलनाच्या अध्यक्षपदी माझे नाव प्रस्तावित केले गेले ही श्री साईबाबांचीच कृपा म्हणावी लागेल. नोव्हेम्बर १९८० मध्ये श्री. च्रेंद्वणकर साहेबांनी पत्राद्वारे माझी संपूर्ण माहिती, प्रकृतीमान कसे काय आहे याची विचारपूस केली. तेव्हा मला वाटले हे सर्व कशासाठी ? मी त्यांना हवी ती माहिती उलट टपाली पाठवून दिली. त्यांच्या दुसऱ्या पत्रात सप्तम लेखक कवी संमेलनाच्या अध्यक्ष पदासाठी माझे नाव प्रस्तावित करीत असल्याचा मजकूर होता. पत्रात हेही लिहले होते की श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व त्यांच्या सहवासात आलेल्या व्यक्तिना आम्ही लेखक-कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलावितो आणि असा रिवाज आम्ही कटाक्षाने आज पावेतो पाळत आलो आहोत. यंदा हे काम आपणास करावयाचे आहे. पत्र मजकूराला श्री साईबाबांची आज्ञा मानून मी माझा होकार त्यांना कळविला. सर्वप्रथम परम-पूज्य श्री सद्‌गुरु साईनाथांच्या चरणी वंदन करून आजच्या सप्तम लेखक-कवी स्नेहसम्मेलनास सुरूवात करु या.

साधुसंताची भेट होणे व अगदी जवळून त्यांचा सहवास घडणे हे परमभाग्य होय असे मी समजते व ते भाग्य मला लाभल्याबद्दल सद्‌गुरूचे आभार मानते. साधुसंत हे जगाच्या उद्धारासाठी व मानवाच्या कल्याणासाठी पृथ्वीवर अवतार घेतात. त्यांच्या हातून भक्तांचे अकल्याण कधीच होत नाही. सभोवतालची परिस्थिती-मुळे मनुष्य कधी कधी अगदी भांबावून जातो. काय करावे, कोठे जावे, कसे वागावे त्याला काहीच कळत नाही. अशा वेळेस निःस्वार्थ भावाने परमेश्वराला शरण जावे हाच एक योग्य मार्ग असतो. पूर्ण श्रद्धा ठेवून शरण जाणाऱ्या भक्तांचे मनोरथ पूर्ण केल्याशिवाय तो दयाघन प्रभू राहात नाही. संताना प्रसन्न करून घेऊन त्यांची कृपा संपादन केली म्हणजे परमेश्वर प्राप्ती होतेच यात काही शंका नाही.

असेच एक अद्वितीय संत श्री साईबाबा शिर्डी मुक्कामी होऊन गेले. आजही ते अदृश्य रूपाने भक्तांच्या कल्याणासाठी पृथ्वीलोकांवर वावरत असतात याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुभव सर्व भक्तांना येत असतो. माझा जेव्हा बाबांशी संबंध आला तेव्हा मी फक्त ७–८ वर्षांची होते. घरातील वातावरणाचा व संस्कृतीचा बाल मनावर जो परिणाम होतो तोच माझ्यावरही झाला. आमचे घरी रोज श्रीं ची पूजा, आरती, दर गुरुवारी बाबांना हार व शिऱ्याचा नैवेद्य न चुकता माझी आई करीत असे. कोणीही फकीर भिक्षेला आला तर रिकाम्या हाती जात नसे.

माझे वडील श्री. लक्ष्मण गणेश महाजनी उर्फ काका महाजनी हे दर उत्स-वाला शिरडीला हजर राहत असत. ते जेव्हा मला घेऊन प्रथम शिरडीला गेले तेव्हा

गेल्याबरोबर बाबांनी मला आपल्या मांडीवर बसवून घेतले व पाठीवर हात फिरवून म्हणाले ही माझी मैना आहे. ते माझ्या वडीलांना म्हणाले—हे परक्याचे धन आहे ते तुला सध्या संभाळावयाचे आहे. ही गोष्ट बाबांच्या कृपेने अजूनही मला आठवते आहे. बाबांना लहान मुले फार आवडत असत. माझे वडील श्री साईबाबांचे परमभक्त होते हे पोथीत लिहिलेल्या निरनिराळ्या प्रसंगावरून आपणास कळून आले असेलच. त्यांनाही निरनिराळे अनुभव आले होते. माझे वडील रामनवमीच्या उत्सवास नेहमी जात असत. प्रथम तेथे आधी उर्स भरत असे ह्याचे वर्णन साईसच्चरित याच्या ६ व्या अध्यायात आलेच आहे. माझ्या वडीलांना भीष्म यांनी विचारले की हा उर्स भरतोच व तो रामनवमीलाच असतो तर तुम्ही मला मदत कराल का ? आपण श्री रामजन्मोत्सव करु तर बाबांची आज्ञा घ्या, म्हणाले. पण उत्सवाला कीर्तन करावे लागते व खेडेगावात कीर्तनकार मिळणे कठीण. भीष्म म्हणाले मी कीर्तनकार व तुम्ही पेटीचा सूर धरा. सुंठवडा वेळेवर तयार करतीलच. मग माझे वडील बाबांच्या पूजेस गेले असताना "वाड्यात काय चालले होते" म्हणून बाबांनी दोघांना विचारले. त्यांना सर्व अंतर्ज्ञान होतेच तेव्हा घडलेली हकीकत सांगितल्यावर त्यांनी परवानगी दिली. दुसरे दिवशी सकाळी पाळणा बांधला गेला. ते पाहून बाबा लेंडीला गेले. तेथून आल्यावर माझ्या वडीलांना बाबांनी बोलावणे धाडले. ते घाबरले की कशाला बोलाविले ! बाबांनी विचारले की—पाळणा कशासाठी बांधला ! वडीलांनी हेतू सांगितल्यावर बाबांना आनंद झाला. लगेच बाबांना माझ्या वडीलांनी एक हार उचलून गळयात घातला व भीष्मांसाठी दुसरा दिला. लगेच कीर्तन झाले. तेव्हापासून रामनवमी उत्सव सुरू झाला. एकदा माझे वडील शिर्डीला उत्सवास गेले असताना दुपारी १२ वाजता मी व माझी आई पुण्यात देवळात रामजन्माच्या कीर्तनास गेलो होतो. त्याचवेळी श्री बाबा आमचे घरी येऊन गेले. घराला कुलूप होते तेव्हा माझ्या वडीलांना श्री साईबाबा म्हणाले मी तुझ्या घरी आताच जाऊन आलो पण घराला कुलूप होते. त्यांनी परतल्यावर आम्हास सांगितले तेव्हा आम्ही मंदीरात गेलो असल्याचे सांगितले. अशा रीतीने आमच्या माहेरी ते येऊन गेले.

लेखक-कवी संमेलनाचा हा क्रम सुरू झाल्याने "श्री साईलीला" मासिकाच्या प्रचार प्रसाराबद्दल नवीन ठरावावर विचार विनिमय करणे शक्य झाले आहे. वाचकवर्गही दरवर्षी वाढत जात आहे. मध्यप्रदेशासारख्या हिंदी भाषा भागातूनही साईभक्त, वर्गणीदार पुढे येत आहे. सम्पर्क भाषा.हिन्दीला मासिकात दुसऱ्या भाषे इतके महत्व मिळावे हे मला या प्रसंगी सुचवावेसे वाटते. "श्री साईलीला"

मासिकास एप्रिल ८१ महिन्यात साठावे वर्ष लागत आहे. मासिक दिवसे दिवस लोकप्रिय होत जावे ही माझी साईचरणी विनंती आहे. यंदाचा ह सोहळा सुव्यवस्थितपणे यशस्वी पार पडो ही शुभेच्छा. पुन्हा एकदा आजच्या कार्य वाहकांचे व साई बंधु-भगिनींचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाला पुढे वाढवू या...

अध्यक्षांचे भाषणानंतर संमेलनाला हजर असलेल्या दोन माजी संमेलनाध्य क्षांची भाषणे झाली १) डॉ. गव्हाणकर व २) श्री. चितांबर. श्रीसाईलीलेचे एक वेळचे संपादक डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर आपल्या भाषणात म्हणाले की, साई लीलेच्या पहिल्या अंकाचे संपादक कै. काकासाहेब महाजनी हे होत. तो अंक मं तेव्हा पाहिला व आता साठाव्या वर्षात साईलीला पदार्पण करीत आहे. तो अंक पण मी पाहिन, व या एकंदर सोहळया निमित्य काकासाहेबांच्याच सुकन्या या ठिकाणी उपस्थित आहेत हे मी माझे परम भाग्य समजतो. मी पूर्वी दोन–तिनदा संमेलनाल आलो होतो त्यावेळचा जो आनंद होता तो आता मला या संमेलनात दिसत नाही या अशा प्रकारच्या मेळाव्याचा उद्देश साईभक्तात प्रेमवर्धन व भक्तीची वाढ व्हावं हाच आहे. आज साईभक्त सेलफिश (स्वार्थी) वृत्तीचे दिसून येतात. बाबांच विचार सरणी त्यांच्या ठिकाणी दिसून येत नाही. काही मंदिरे तर स्मगलिंगच सेंटर्स आहेत. आज बाबांच्यावर विविध पुस्तके प्रकाशित होत आहेत पण त्या पाहिजे ते नसते. साईलीलेतून अलिकडे प्रसिद्ध होणाऱ्या कवितांमधून उत्कटते भावना दिसून येत नाही. बहुसंख्य कविता या अगदी टाकून देण्याच्या गटार गंगे टाकण्याच्या लायकीच्या असतात. अशी प्रखर टीका पण त्यांनी जाता जाता केल आपले भाषण करता करता कित्येक ठिकाणी तर त्यांचा आवाज उंचावत होता.

डॉ. गव्हाणकरांच्या भाषणानंतर माजी अध्यक्ष नगरचे श्री. अ. ज. चितांब यांनी श्रीबाबांची महत्ता व शिर्डी येथे येण्याने जे पुण्य पदरी पडते त्याचे थोडक्या वर्णन केले.

यानंतर कोर्टरिसिव्हर साहेब व श्रीसाईलीला मासिकाचे मुख्य संपादक श्र क. हि. काकरेसाहेब यांनी भक्तांनी केलेल्या सूचनांना उत्तरे दिली व समारोपा आटोपशीर भाषण केले. विशेषतः साईलीलेची हिंदी आवृत्ती प्रकाशित करण्यासंबं ते म्हणाले, की ज्या ज्या ठिकाणी ज्या मंडळींना साईलीलेची हिंदी आवृत्ती काढावी वाढते त्या ठिकाणच्या मंडळींनीच पुढाकार घेऊन तशी आवृत्ती त्यांच्या जबाबदा वर काढण्यास हरकत नाही फक्त संस्थान सध्या मराठी व हिंदी इंग्रजी अशा द भाषेतून आवृत्या काढीत आहे तेवढे पुरेसे आहे.

यानंतर श्री साईलीलाचे इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. त्यापूर्वी त्यांनी भक्तांनी विचारलेल्या काही सूचनांना समर्पक उत्तरे दिली. यानंतर या संमेलनाला उपस्थित असलेल्या सर्वांना तिळगूळ वाटण्यात आला व सर्वांचा हार व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. धुळयाचे नागेश मोगलाईकर यांची महाराष्ट्र राज्य सरकारने स्पेशल एक्झीक्युटिव्ह मॅजीस्ट्रेट म्हणून नेमणूक केल्याबद्दल त्यांचा संस्थाननेही विशेष गौरवपूर्ण शब्दात उल्लेख करून सत्कार केला गेला. पुढे महिला भक्त मंडळीतर्फे प्रतिनिधी त्वाच्या हक्काने लोनावळयाच्या सुप्रसिद्ध डॉ. सौ. सुमतीदेवी खानविलकर यांनी व पुरुष भक्तांचेतर्फे पुण्याचे प्रा. र. श्री. पुजारी साहेब यांनी संस्थानचे, संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांचे अधिकाऱ्यांचे आभार मानले. संस्थानच्या शिरडी कार्यालयाचे ऑफिस सुपारेंटेंडेंट श्री. द. चिं. पाठकसाहेब यांनीही हे संमेलन यशस्वी पार पाडण्यासाठी बरेच कष्ट घेतले याबद्दल त्यांचेही आभार मानण्यात आले.

या समारंभासाठी मुंबई कचेरी मुख्य लेखापाल श्री. वि. श्री. आपटे साहेब व कु. रेखाताई दिघे लेखापाल संपूर्ण कार्यक्रमास हजर होते व त्यांनी सर्व त्या कार्यात मदत केली तसेच नेहमीप्रमाणे कुमार सुभाष चेंदवणकर यांनी भक्तांची सुयोग्य व्यवस्था लावण्यासाठी त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी मेहनत घेतली.

श्री. पुजारी यांचे भाषणानंतर श्री परुळेकर रचित निरोपगीत म्हणण्यात आले व मुंबईचे श्री. श्रीराम सातर्डेकर यांनी सुंदर भैरवी म्हटल्यावर हा दोन दिवसांचा गतच्या स्नेहसंमेलनाचा सोहळा यशस्वीपणे संपला. रात्री दरबारात श्री. खडकेसाहेब यांचे एक निकट आप्त श्री. गौतमसाहेब यांनी उत्कृष्ट रागदारी तासभर सादर केली होती.

## आप्पासाहेब रासने साईचरणी विलीन

' थोर साईभक्त श्री. नानासाहेब रासने यांचे बंधु श्री. त्रिंबक दामोदर उर्फ आप्पासाहेब रासने हे शनिवार दि. १४-२-८१ रोजी रात्री ९-१५ वाजता अहमदनगर मुक्कामी श्री. साईचरणी विलीन झाले.'

श्रीसाई मृतात्म्यास चिर सद्‌गती व शांती देवो

# आपल्या जीवनात साईबाबांना सामावून घ्या

-श्री. रा. ब. बारशी
७३।६ काटोल, जि. नागपूर

● प्रत्येक साईभक्तांनी ही खात्री बाळगावी आपला स्वतःचा संबंध प्रत्यक्ष साईबाबांशी प्रस्थापित करता येतो. मात्र याकरिता आत्मविश्वासाची आवश्यकता आहे. आत्मविश्वास असला की त्याला खऱ्या आनंदाचा अनुभव व त्याची पूर्तता जीवनात होऊ लागते. ज्याक्षणी आपण श्रीसाईबाबांवर विश्वास दाखवाल त्याच क्षणी तुमच्या शरीरात प्रत्यक्ष साईबाबा वास करतील. बाबांच्या वचनाप्रमाणे वागावयास सुरुवात करा.

जे आपल्याजवळ आहे त्यातील देता येईल तेवढे दुसऱ्यांना द्या. याचकाला रिकाम्या हाताने परत करू नका. प्रत्येक प्राणीमात्रांचे ठायी साईबाबांचा वास आहे लक्षात ठेवा. उपकार करणाऱ्यांवर उपकार कराच. परंतु अपकार करणाऱ्यांवर सुद्धा उपकार करा. आपले जवळ असलेला अहंपणा घालवा व बाबांच्या चिंतनात विलीन व्हा. आपल्यास सर्व सोडून एकटेच जायचे आहे हे ध्यानात ठेवून बाबांच्या नामस्मरणात रममाण व्हा. बाबा आपल्या अडचणीच्या वेळी एका हाकेतच आपणास भेटेल. ते नेहमीच आपल्याजवळ वावरत असतात परंतु आपली आंतरीक हाक ऐकल्याशिवाय ते धावून येत नाही. श्रद्धा ठेवा व उशीर लागला तरी घाबरू नका.

"सबुरी का फल मीठा होता है" आंब्याची कोय पेरली तर मधुर आम्रफळच चाखावयास मिळेल. कडू कारल्याची बी पेरून आम्रफळाची आशा करणे योग्य नाही. तसेच चांगल्या कर्माचे फळ चांगले मिळेल. वाईट कर्म करून चांगल्या फळाची अपेक्षा करणे शहाणपणाचे होईल काय ?

'जसे पेराल तसे उगवेल' वाईट कर्माचे फळ लगेच मिळते परंतु चांगल्या कर्माचे फळ मिळावयास उशीर जरी लागत असेल तरी त्यात अवीट गोडी असते.

वाईट व्यसनाची गुंगी आणून घाणीत पडण्यापेक्षा बाबांच्या नामस्मरणाची गुंगी चढवा व या गुंगीत पडलात तर बाबांच्या चरणीच पडाल ही खात्री बाळगा. बाबा आपणास सावरून घेतील. व्यसनच जर लावावयाचे असेल तर बाबांच्या ध्यानाचे लावा. हे व्यसन आपणास तारुन नेईल. विश्वास बाळगा—

जया मनी जैसा भाव ।
तया तैसा अनुभव ।।

# श्रीसाईबाबांचे " शक्ति " स्वरुप

—श्री. चकोर आजगावकर एम्. ए
वाय ११।१७० सरकारी वसाहत, बांद्रे (पूर्व)
मुंबई ४०००५१

● श्री बाबांविषयी बोलताना कुणी त्यांना ' शक्ति 'रुप संबोधतात, तर कुणी ' शिव 'रुप मानतात. ज्ञानीमाणसांचे हे बोलणे तुम्हा भक्तांना काही समजत नसते. पण बाबा हे जगाचे प्रपितामह परम शिव आहेत, तसेच त्या शिवाची महाशक्ति त्यांच्या पायाची दासी आहे, हे मात्र आपणा सर्वांना मनातून समजत असते आज आपण या शिवशक्तीचा थोडा परामर्ष घेऊ या.

● बाबांचे पहिले गुरु श्री व्यंकुशा उर्फ गोपाळस्वामी यांचे पाशी फकीरस्त्री एका बालकाला ( म्हणजे बाबांना ) घेऊन आली, त्यावेळी गोपाळस्वामी म्हणाले, " हा पहा शिव आला आहे " काही साधक बाबांना शक्तिरुप जगदंबा म्हणून माणतात. काहीजण बाबांचा अवतार ' शक्ति ' रुप होता; असे सांगतात. परंतु शिव आणि शक्ति या काही वेगळया गोष्टी नसुन ती एक अभिन्न जोडी आहे. जेथे " शिव, " तेथे " शक्ती " अस्तित्वात असतेच. तेव्हा बाबापासुन शक्ती ही पृथक राहू कशी बरे शकेल ?

● मूळ निर्विकल्प ब्रह्म हे परंज्योतिरूप प्रकाशमय आहे. या परब्रह्माचा शक्तियुक्त अहंकार म्हणजे परमेश्वर होय. या परमेश्वराभोवती त्याची माया असते. परमेश्वर हा मायेच्या सहवासाने चित् शक्तीमय बनतो. विमर्शरूप होतो. त्यातून शिवशक्तीचे द्वैत प्रगट होते. साधकाला समजू शकते. या द्वैताद्वैताला शिवाची गुरुरुप शक्ती सांधते, एकरूप बनविते. शिवाच्या अद्वैत आदिशक्ति रुपातून त्रिगुणात्मक माया प्रगट होते. ती त्रिपुरा शक्ति होय. विश्व निर्माण करताना शिवगुरु हे त्रिपुराशक्तीद्वारे प्रपंचाची पंचमहाभूतात्मक सृष्टी निर्माण करतात. याच्या उलट मूळ ब्रह्माच्या साक्षात्काराकडे जाताना या पंचभूतात्मक सृष्टीचा प्रलय करून त्रिपुरेची त्रिगुणात्मक माया ओलांडावी लागते. येथे शिवगुरु आपल्या कृपेद्वारे आपल्याला प्रपंचातून पुन्हा शुद्धाहंकाराकडे नेतात व तेथून आपले परंज्योतिरूप परब्रह्म दाखवितात.

● वरील प्रक्रियेमध्ये प्रपंचाची दिशा व साक्षात्काराची दिशा अशा वेगळया दोन दिशा सामावलेल्या आहेत. प्रपंचातून साक्षात्काराकडे नेणारी श्री शिवगुरुची उद्धारक शिवशक्ति होय. यामुळेच गुरुवाचून मोक्षाचा रस्ता समजत नाही. श्रीसाईबाबा हे साधकाच्या मस्तकात आज्ञाचक्रावरील सिद्धवर्तुळात वसणारे शिवगुरु आहेत. प्रत्येक साधकाच्या मस्तकातील या हंसपार्श्व त्रिकोणात श्रीबाबांचा अधिवास आहे. श्रीसाईबाबांच्या समवेत त्यांची गुरुमंडळरूपिणी बिंदुत्रिकोणात्मक शक्ती आहे. भूमध्य भागावर श्रीबाबांच्या श्रीगुरुपादुका आहेत. या पादुकावर हृदयाकाशातील सगुणभक्तिभावाचा अभिषेक होत असतो. या त्रिवेणी संगमावर स्नान करणाऱ्यालाच मस्तकातील श्रीबाबांच्या शिवलिंगाचे दर्शन घेता येते ! हे शिवशक्तीचे परमरहस्य समजून घ्या.

● बाबांना फक्त नवसास पावणारे व अवघड आपत्ती टाळणारे म्हणून अन्न अर्थार्थी माणसे ओळखीत असतात. परंतु त्यांचे ज्ञानस्वरुप व योगस्वरुप सर्वांना ज्ञात नसते. बाबा म्हणत की "माझ्या सरकारचे (परब्रह्माचे) धन येथे वावरं वावरं भरून पडलेले आहे. परंतु ते कुणी मागतच नाही." त्या मोक्षधनाची ही दिश प्रत्येकाला जरि अनुसरता आली नाही, तरी जाणून घ्यावयास तर हरकत नाही ना ? बाबांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक भक्ताला हे शिवशक्तीचे आध्यात्म रहस्य जाणून घ्यावयास हवेच हवे !

●

## श्री. भिकचंद बाकलीवाल यांचे निधन

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या भोजन विभागाचे प्रमुख श्री. बी. बी. बाकलीवाल यांचे वयोवृद्ध वडील श्री. भिकचंदजी बाकलीवाल यांचे २३ जानेवारी १९८१ रोजी कोपरगाव येथे वयाच्या ८७ व्यावर्षी निधन झाले. त्यांनी आपल्या वयाच्या दहाव्या वर्षी साईबाबांना पाहिले होते. श्री. भिकचंद जींच्या मागे ७५ वर्षांच्या वयोवृद्ध पत्नी, ६ पुत्र १ कन्या, नातवंडे व असंख्य मित्र परिवार आहे.

श्रीसाई मृतात्म्यास चिरसदगती व चिरशांती देवो ही संस्थानतर्फे त्यांना श्रद्धांजली.

# * जीवनातील आनंद *

—श्री. बबन धोंडू येरम
१९५, कल्याणजी देवजी चाळ, चिरागनगर
घाटकोपर, मुं. ८६

● निराकार-निर्गुण परमेश्वराची उपासना करणे ही फार वरच्या पायरीची गोष्ट आहे. योग्य गुरु भेटला की परमेश्वर प्राप्ती दूर नाही. परंतु तत्पूर्वी सगुणसाकाराची ओळख होणे फार जरुरीचे असते. अशा प्रकारच्या उपासनेसाठी आपण कोणत्याही देवाची व संत महात्म्यांची उपासना करतो. राम, कृष्ण, भ. रामकृष्ण परमहंस अक्कलकोट स्वामी, साईबाबा इ. सत्पुरुषांची उपासना देखील सगुणकारात मोडते आणि अशी उपासना करताना त्यांच्यावर भक्तीभाव जडला की आपोआप योग्य गुरुची भेट साधकास होते असा जगाचा अनुभव आहे.

श्रीसाईबाबांच्या जीवनातसुद्धा बाबांच्या भक्तांना काही योग्य गुरु भेटले होते; तर प्रत्यक्षात काहीना साईबाबांनीच आत्मज्ञान देऊन परमेश्वर प्राप्तीसाठी मार्ग मोकळा करून दिला.

साईबाबा प्रत्यक्षात देव होते. जनकल्याणासाठी त्यांनी मानवदेहात राहून हजारो भक्तांना सुखी केले व काही मुमुक्षूना भक्तिमार्गात मार्गदर्शन केले.

बाबांच्या निर्वाणानंतर देखील त्यांनी भक्तांना कृपावंत केले. त्याचे कारण बाबांच्याविषयी अनन्यभक्ती हीच होय. नामामध्ये फार मोठी शक्ती असते. सतत देवाचे नाम घेत राहिल्याने भक्तास एक प्रकारची अनामिक शक्ति मिळत असल्याचा अनुभव होतो. साईनामात सुद्धा फार मोठी शक्ति आहे. साई...साई किंवा बाबांचे एखादे नाम सतत मुखात ठेवले असता जगाची विस्मृती होते, व छोटी छोटी संकटे आपोआप दूर होतात. नाम घेताना आपल्या सुखदुःखाचा विसर पडतो.

नाम स्थिर झालं म्हणजे साधकास सर्वांभूती होते. साईबाबांच्या नामामध्ये जी भक्ति आहे ती अनाकलनीय, अगाध आहेच परंतु त्यांच्या पोथीमध्ये देखील एक जीवनव्यापी तेज आहे, त्या अलौकिक तेजाचा अनुभव आहे, त्या अलौकिक तेजाचा अनुभव केवळ पोथीवाचकालाच मिळतो. नामांबरोबर पोथीवाचन ही साईकृपा घड-

वून आणण्यास मदत करते. पोथीवाचनामुळे घडलेले चमत्कार शेकडो भक्तांच्या हृदयात जतन झालेले आहेत. हे ‘ साईलीला ’ मासिक वाचताना ताबडतोब कळून येते. इतकी त्याची थोरवी आहे. संकटे येण्यापूर्वीच बाबा पोथी वाचण्याची प्रेरणा देतात व संकटे मेघासारखी वितळतात असेही गूढ अनुभव भक्तांना येतात.

परंतु......

परंतु या घटना घडण्यासाठी एका गोष्टीची आवश्यकता आहे. साईबाबांच्याच शब्दात बोलायचे म्हणजे श्रद्धा व सबुरी ही होय. श्रद्धा किंवा विश्वासच कोणत्याही गोष्टीत फलदायी होतो. विश्वासः फलदायकः हे वचन सार्थ आहे याची प्रचिती येते. भगवंतावर विश्वास ठेवून फळाची वाट पहा. सबुरी घेतल्याशिवाय जीवनात अपेक्षिलेली गोष्ट मिळणार नाही, हे सत्य होय. म्हणून साईबाबांची उपासना करणाऱ्याला स्वतःच्या जीवनात श्रद्धा-सबुरीची आवश्यकता आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे त्याचप्रमाणे ‘ माझी संकटे बाबांच्या कृपेने नक्कीच नाहीशी होणार ’ असा दृढ विश्वासही ठेवल्याशिवाय गत्यंतर नाही.

आजच्या धकाधकीच्या जीवनात साईबाबा ही अशी एक महान, तेजस्वी शक्ती आहे जी सामान्य जीवनाचे कल्याण करणारी आहे. प्रत्येकाच्या जीवनात आनंद निर्माण करणारी आहे व प्रत्येकाला जीवनातील अनुपम आनंदाची जाणीव करून देणारी आहे; कारण जीवनात जो आनंद असतो तो उपभोगण्याचे सामर्थ्य आपल्याला केवळ ईश्वरी नामानेच मिळतो हे सत्य आहे. शुभ भवतु !


## श्री साईलीला

**पुढील अंक खास रामनवमी विशेषांक**

आणि

श्रीसाईलीला साठाव्या वर्षाचा पहिला अंक

१ एप्रिल १९८१ रोजी थाटात प्रसिद्ध होत आहे.

**पृष्ठे ६४ किंमत १ रु.**

मुखपृष्ठावर श्रीसाईनाथांचे संग्राह्य चित्र

# हरवलेली बॅग सापडली

▲
▲ ▲

—कु. रमा व्यंकटराव मुळे
'व्यंकटेश प्रसाद' पहिला मजला
रुम नं. १६ एन्. सी. केळकर रोड
दादर मुंबई २८

"नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य
नित्य घ्या प्रचित अनुभवे"

ह्या श्री साईबाबांच्या वचनाची प्रचिती आम्हाला आली आहे. श्रीसाईबाबांनी समाधी घेतली असली तरी त्यांना आपल्या भक्तांनी अंतःकरणापासून आळवले असता, प्रार्थना केली असता, ते त्यांच्या हाकेला धावून येतात. त्यांना फक्त आपल्या अंतःकरणातील निर्मळ प्रेम, शुद्ध भक्ती हवी असते. आम्ही साई कुटुंब आहोत.

गत वर्षाच्या श्रावणाच्या पहिल्या सोमवारी आम्हाला श्री साई शंकरास अभिषेक करायचा होता. म्हणून मी माझी कु. भाची भाचा (भावाचा मुलगा व मुलगी) आमच्या सौ. जाधव वहिनी त्यांच्या दोन लहान मुली, माझी मोठी बहिण व तिचे यजमान आणि तिच्या दोन मुली असे आम्ही दहाजण शिर्डीस गेलो होतो. श्रीबाबांना आम्ही अभिषेक, बेलाचा हार, लोणी साखर नैवद्य इ. प्रकारे पुजा करून प्रसाद घेतला. त्यांची आमच्यावर सदैव कृपेचे छत्र असावे म्हणून प्रार्थना केली. आम्हाला शिर्डीत साठ्यांच्या वाड्यात तीन दिवसाच्या मुक्कामास रहावयास जागा मिळाल्यामुळे मला तर असे वाटले की, आपण श्री साईबाबांच्या अत्यंत निकट सान्निधात रहात आहोत. आमच्या सौ. वहिनीस व बहिणीस तर मनोमन वाटत होते की, आम्ही नागपंचमीच्या सणास सासुरवाशीणी मुली माहेरास आल्या आहोत. चार दिवस श्री साईबाबांच्या सहवासात कसे निघून गेले ते आम्हाला कळलेसुद्धा नाही.

श्री समर्थ साईबाबांना पुन्हा त्यांच्या दर्शनास लवकर बोलावण्याची प्रार्थना करून आम्ही एस. टी. ने मुंबईस जाण्यास निघालो. एस. टी. तही आम्ही हसत खेळत प्रवास करीत होतो. माझ्या बहिणीची मुलगी खिडकीकडे बसली होती. तिने तिच्या शेजारील एक साईभक्त श्री. महाडीक यांच्याकडून एक पुस्तक वाचण्यास मागितले. ते वाचून परत देत असताना त्यांनी तिला सहज विचारले की, काय बेबी

तुझे नाव काय ? तू कोणत्या शाळेत जाते ? त्यावर तिने आपले नाव व शाळेचे नाव सांगितले. आम्ही सर्वजण पलिकडे गप्पा मारीत हसत खेळत होतो. रात्री पावणे बारा वाजता दादर केव्हा आले हे आम्हाला कळले सुद्धा नाही. आम्ही आमचे सामान घेवून घरी जाण्यास निघालो. एस. टी. पुढे बॉम्बे सेंटरला गेली. नंतर एक दोन मिनिटात माझ्या भाच्याच्या लक्षात आले की, बॅग बसमध्येच राहून गेली.

लगेच माझा भाचा बॉम्बे सेंटरला एस. टी. डेपोत गेला. तेव्हा डेपोत बस रिकामी झाली होती आणि आमची बॅगही तिथे नव्हती. कंडक्टरला आणि ड्रायव्हरला विचारल्यावर त्यांनी सांगितले की, आम्हाला काही कल्पना नाही. तुम्ही आतील ऑफिसात कोणी बॅग आणली का म्हणून चौकशी करा. तिथे चौकशी केल्यावर तिथेही बॅग नाही असे आढळून आले.

आम्हाला प्रथम वाटले की, आपली बॅग गेली. आता ती काही मिळणार नाही. पण तरीही आम्ही घरी श्रीसाईबाबांकडे प्रार्थना केली. आमच्या हलगर्जीपणामुळे हे सर्व झाले. तरीही आपल्या कृपेने आम्हाला आमची बॅग परत मिळू दे. बॅगेत सर्व सामान कपडे वगैरे होते. त्यामुळे जीवाला हुरहुर वाटत होती. आमच्या सौ. जाधव वहिनी साईबाबांकडे गाऱ्हाणे घालत होत्या. रमाची बॅग सापडू दे. बाबा मी तिच्या हातून तुमच्याकडे श्रीफळ ठेवण्यास सांगीन. आम्ही सर्वजण साईनाथांना आळवित असताना इथे काय झाले. बॉम्बे सेंटरला डेपोत बॅग राहिलेली श्री. महाडीक यांच्या लक्षात आले आणि आठवले की, त्या बेबीने आपले नाव कु. वंदना भांडेकर, साने गुरुजी विद्यालय, शिवाजी पार्क असे सांगितले. दुसरे दिवशी ते व त्यांचे काही मित्र कुलाब्याला रहात असल्यामुळे कुलाब्याहून टॅक्सीने पत्ता शोधीत ते शाळेत गेले. शाळेतील प्रिंसिपॉलना शिर्डीचा प्रसाद देवून, त्यांनी कु. वंदना भांडेकरला बोलावून घेतले, आणि तिच्याकडून आमच्या घरचा पत्ता मिळविला.

त्यावेळी सकाळपासून पाऊस सतत पडत होता. आमच्या घरचा पत्ता शोधीत ते बॅग घेऊन दारात आले. मुसळधार पावसात भिजल्यामुळे ओलेचिंब झाले होते. घर बसल्या आम्ही त्यांना व बॅगला पहाताच माझ्या एका डोळयात आनंदाश्रु आणि एका डोळयात हासू आले. मनात आनंद आश्चर्य इतका झाला की, भावना प्रगट करावयास तोंडातून शब्दच बाहेर पडेनात. श्री साईबाबा आपल्या भक्तांसाठी किती लवकर मदतीला धावून येतात. त्यांनी आम्हाला घरबसल्या आमची बॅग आणून दिली.

असा हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग घडून आला. अशा ह्या दयाळू साईमाऊलीला माझे कोटी कोटी प्रणाम !

# भक्तांची काळजी बाबांना

—श्री. नंदकुमार रामचंद्र खेडे
'सौभाग्य' १७४६, शुक्रवार पेठ,
जेधे प्रासाद रस्ता, पुणे–४११ ००२

● माझे एक नातलग श्री. चंद्रकांत चव्हाण व त्यांचा १२ वर्षाचा मुलगा आम्ही सर्वजण ता. २६ जानेवारी ७९ रोजी लातूरला गेलो होतो, तेथील दुसरे दोन नातलग ( श्री. भुमकर व श्री. चव्हाण ) सोबत घेवून पुढे बीडला गेलो तेथे एक दिवस थांबून पुण्याला परतण्याचा पूर्वनियोजीत कार्यक्रम होता. परंतु माझे मनात त्यावेळी असे आले की, पुण्याला जाताना व्हाया अहमदनगर जावे लागते, तर शिरडीलाही जावुन परमपूज्य श्री साईबाबांचे दर्शन घ्यावे. शिवाय माझेबरोबरचे श्री. चंद्रकांत चव्हाण ह्यांनी शिरडी पाहिलेली नव्हती, त्यांना तो योग घडवून आणावा व नंतर पुण्याला जावे. माझा हा विचार मी त्यांचेपुढे प्रत्यक्ष सांगितल्यावर त्यांना तो पसंत पडला. शिवाय बीडला आलेल्या लातूरच्या दोघांपैकी एक श्री. हरीभाऊ चव्हण हे सुद्धा आमचे बरोबर शिरडील येण्यास तयार झाले.

आम्ही शिरडीला प्रयाण करण्यापूर्वी आमच्या खिशा पाकीटांचा सल्ला प्रत्येकाने घेतला, तेव्हा प्रवास खर्चापुरतेच मोजके पैसे आमचे तिघांजवळ होते, दोन रुपये सुद्धा जादा खर्च करणे शक्य नव्हते. बाबांचे नामस्मरण करून त्यांचेवर जबाबदारी टाकून मी माझेबरोबरच्या नातलगाना घेऊन शिरडीला निघालो, नातलग तिकडे प्रथमच येत होते. आम्ही ता. २९ ला पहाटे तेथे पोहोचलो स्नान करून पूजा साहित्य, प्रसाद घेऊन समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. संपूर्ण शिरडीत फिरलो, नंतर दुपारचे भोजन घ्यावे व आपआपल्या गावी निघावे म्हणून पुन्हा एकदा आम्ही प्रत्येकांनी आपल्या जवळील पैसे मोजले, तेव्हा नेमके पुण्याला जाण्यापुरते २॥ तिकीटाचे पैसे व एका व्यक्तीस लातूरला जाण्यापुरते मोजके पैसेच आमचेजवळ होते, भोजनासाठी पैसे खर्च करणे अशक्य होते.

सकाळचे ११ वाजले होते व आम्ही भोजनाबद्दल आपसात चर्चा करीत होतो, आमचे गावी पोहोचेपर्यंत उपाशी राहणे शक्य नव्हते, शेवटी असे ठरले

लातूरच्या व्यक्तीने बार्शी ( जि. सोलापूर ) पर्यंत जायचे, तेथे त्यांचे बहीणीकडून पुढील प्रवासाकरीता पैसे घेऊन नंतर लातूरला जायचे. असा विचार करून आम्ही शिर्डी संस्थानचे भोजन गृहाकडे जाणार तोच-माझे परिचयाचे व शिर्डी संस्थानचे विद्युत् पुरतठा खात्याचे प्रमुख श्री. कुलकर्णी साहेब आमचे समोर येवून उभे राहीले, त्यांनी आमची चौकशी केली, " केव्हा आलात ? " " दर्शन झाले का ?" " बरोबरीची मंडळी कोण आहेत ? " इ. इ. शेवटी त्यांनी असा प्रश्न केला, " पुढचा कार्यक्रम काय आहे ? भोजन केले ? "

मी त्यांना सांगितले " आणखी अर्ध्या तासाने भोजनगृहात जाणार आहोत !" त्यावर ते म्हणाले, " प्रथम माझे ऑफीसमध्ये चला नंतर भोजनाचे पाहू !" आम्ही सर्वजण त्यांचेबरोबर गेलो, नको नको म्हणत असताना चहापान झाले. गप्पा झाल्या, व नंतर निवांत तासाभराने त्यांनी स्वतः आमचेबरोबर येवून संस्थान भोजन गृहात आमची जेवण्याची सोय केली, आम्हाला पैसे खर्चून दिलेच नाहीत.

आहे की नाही चमत्कार ! श्री साईनाथ बाबांचे कृपेमुळे मी नवीन भक्त मंडळीना घेवून शिरडीत गेलो, मग आमची सर्व काळजी त्यांनाच. ते आपल्या भक्तांना उपाशी कसे ठेवणार ? भोजनानंतर पुनः देवदर्शन घेवून आम्ही आनंदाने आपआपल्या गावी सुखरुप पोहोचलो.

-यापूर्वी श्री बाबांनी आपल्या कृपेमुळे मला व माझे कुटुंबियांना अनेक लहान मोठे चमत्कार दाखवून थक्क केले असून संकटकाळी रक्षण केले आहे.

" हेचि दान देगा देवा ! "
तुझा विसर न व्हावा !

## नांदा सौख्य भरे

गिरगाव, मुंबईचे साईभक्त श्री. व सौ. केशवराव गोळवणकर यांची कन्या चि. सौ. कां. जयमाला हिचा विवाह कै. अंकुश अणावकर यांचे जेष्ठ पुत्र श्री. दिलीपकुमार यांचेशी राजर्षि शाहू सभागृह, शिवाजी मंदिर, दादर येथे रवि. ता. १५-२-८१ रोजी दुपारी २-४५ चे सुमुहूर्तावर साजरा झाला. वधूवरांना शुभाशिष.

# श्री बाबांची सत्ता

—सौ. सुनंदा मधुकर कोकाटे
११ दत्तधाम, गोखले रोड डहाणूकरवाडी,
कांदीवली पश्चिम ४०००६७

● गेल्या वर्षीच्या नवरात्रातील अष्टमीची रात्र मला आठवली. आज सबंध दिवस मंगळसूत्र काढून महालक्ष्मीच्या तसबिरीसमोरच ठेवले होते.

त्याचे असे झाले. मला गेल्या वर्षी गुडघ्यांच्या सांधेदुखीचा खूपच त्रास व्हायचा. चालताना रग लागायची, म्हणून मी गिरगावचे प्रसिद्ध वैद्य नार्वेकर यांचे औषध सुरू केले होते. पंधरा दिवसांचे औषध एकदम आणत असू.

नवरात्रातील अष्टमीचा दिवस होता तो! मी शाळा सुटल्यानंतर यजमानां बरोबर वैद्यांकडे गेले. त्यांच्याकडे खूप गर्दी होती. आठ वाजता नंबर लागला. औषध घेऊन आम्ही निघालो. चर्नीरोड स्टेशनवर आल्यावर आम्ही उलट चर्च-गेटला गेलो. मी यजमानांबरोबर पुरुषांच्याच डब्यात बसले होते. खिडकीजवळची हवेशीर जागा मिळाली. औषधांच्या बाटल्या हिंदकळतील म्हणून ती पिशवी फक्त मांडीवर घेऊन बसले. बाकी सर्व वर ठेवले.

अंधेरी येईपर्यंत डब्यात खूपच गर्दी झाली होती. मी डोळे मिटून बाबांचे नाम-स्मरण करीत होते. अंधेरी स्टेशन आले तेव्हा मी डोळे उघडून बाहेर पाहिले. एक तरुण खिडकीच्या गजाला धरून उभा होता. काळोखात त्याचा चेहरा स्पष्ट दिसला नाही. माझे मंगळसूत्र पदराच्या बाहेर होते. माझे तिकडे लक्षही नव्हते आणि गाडी सुरू झाली...

बाहेरील तरुणाने गजातून हात घालून माझे मंगळसूत्र खेचले. माझ्या यज-मानांनी खिडकीकडे धाव घेतली. दोन स्त्रिया हासडल्या. त्यांना वाटले मंगळसूत्र गेले. त्यांना तरी काय माहीत की साईबाबांनी विरुद्ध बाजूने ते खेचल्यामुळे ते विरुद्ध बाजूस घरंगळत आले. समोर बसलेल्या गुजराती प्रवाशांनी ते पाहिले आणि दोघेही एकदम ओरडले—

" हाय, हाय. गेला नाय. बाय तुम्ही अंबा मातेला परसाद करा. अंबामातेनेच तुमचा मंगळसूत्र वाचवला. " मी तिथेच डोळे मिटले व बाबांना नमस्कार केला. मी गाडीत बसले आहे, खूप लोक येथे बसलेले आहेत याचे भानच मला राहिले नाही. खणखणीत आवाजात मी म्हणाले—

" मंगळसूत्र माझे असते तर गेले असते त्यावर सत्ता आहे बाबांची म्हणूनच ते राहिले. "

डब्यातील माझ्या आसपासचे लोक बाबांच्या शक्तीशाली सामर्थ्याचे माझे प्रवचन अवाक् होऊन ऐकत राहिले. कांदीवली येईपर्यंत !!

☆


॥ श्री दत्तमहाराज प्रसन्न ॥

नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचीत, अनुभवे ॥

सोन्याची शुद्धता आणि कलात्मक दागिने बनविणारी
माहिम भागातील एकमेव पेढी म्हणजेच—

**मे. शंकर हरी वैद्य (रत्नागिरीकर)**
**आणि कुष्टे ज्युवेलर्स**

पाठारे मॅन्शन, ले. ज. रोड, माहिम, मुंबई—४०० ०१६.
( सिटीलाईट सिनेमा जवळ )

[ बी. वाय. पी. ]

# साई भक्तांस साई भक्ताची विनंती

—सौ. सुनिता चावक
डोंबिवली

● गेल्या पाच ते सहा वर्षात श्री शिर्डी संस्थान व आपले आद्य दैवत 'श्रीसाईनाथ' ह्यांना सर्व महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध भारतात फारच प्रसिद्धी मिळाली आहे. प्रत्येकी सरासरी दहा जणा पैकी कमीत कमी तीन व्यक्ति ह्या श्रीसाईच्या भक्तीत समरस झाल्याचे आपणास त्यांच्या बोटातील साईच्या अंगठी वरून समजून येईल. तसेच शिर्डी क्षेत्री वाढत्या गर्दीवरून ह्याचा आपणास अनुभव येईल.

हे सर्व पाहून मनाला जरी समाधान वाटत असले तरी परवा मी गाडीतून प्रवास करीत असताना दोन लहान मुले गळयात साईबाबांचा फोटो अडकवून व "शिर्डीवाले साईबाबा आया है तेरे" हे गाणे गात भीक मागत होती, आणि हे दृश्य पाहून मन अतिशय खिन्न झाले.

इतक्या खालच्या पातळीवर जर हे प्रकार जात असतील तर मात्र आपले व्यवहारीक दृष्टया कुठेतरी चुकतय असे वाटायला लागते. इतकी हीनतेची पातळी आपली श्रद्धा जर गाठीत असेल तर मात्र आपण सर्वांनी काही ठराविक गोष्टींवर संयम राखायला हवा.

वरील प्रकार थांबवायचा 'म्हणजे काय करावयाचे'? असा प्रश्न उपस्थित होतो. तर त्यासाठी आपणास काही कठोर निर्णय घ्यावयास हवेत.

श्रीसाईनाथ नेहमी म्हणत "माझ्या भक्तांवर जर कोणते संकट आले, तर मी भक्तांसाठी धावून जाईन" ह्याचा अर्थ असा की, भक्तांवर येणारे संकट मानव निर्मित नसावे उदा० जर एखादा जुगारी बाबांचा मोठा भक्त आहे, आणि तो एखाद्या दिवशी जुगारात पैसे हरला व त्याने श्रीसाईंची प्रार्थना करून श्रींकडे याचना केली की, 'हे साईनाथा मला आता तार, आणखी थोडे पैसे कोठूनही ह्या वेळेस मला दे 'म्हणजे मी माझे जुगारात हारलेले पैसे वसूल करीन' तर अशा भक्तास काहीच न देता आणखी कफल्लक करतील. कारण ह्यामध्ये मानव निर्मित नीती काय आहे. आणि अशा वेळेस साई काय कुठलाही परमेश्वर आपल्या भक्तास मदत करणार नाही.

म्हणून माणसाने आपल्या वाट्याला आलेले कार्य पूर्ण प्रयत्नांती सफल करावे प्रामाणिकपणाने जर कुठलेही काम केले तर त्यास साईंचे आशिर्वाद आहेतच. याचा अर्थ प्रामाणिकपणे भीक मागितल्यास त्यासही सहाय्य साई करतील असा नव्हे, तर परमेश्वराने आपणास हात, पाय, डोळे, डोके दिले असून त्या सर्व अवयवांचा उपयोग करून प्रयत्न केल्यास परमेश्वर आपणास निश्चितच मदत करील.

बरेच जण नशिबाला दोष देत व साईंचा आपणास आशिर्वाद आहे असे कुठलेही कार्य कष्ट न करता फळाची अपेक्षा धरतात. त्यासाठी ते स्वतःजवळील श्रद्धा सुद्धा विकताना दिसतात. उदा. मी अनेकवेळा अनेक भक्ताना श्रीसाईंक्षेत्री लॉटरीची तिकीटे विकत घेताना पाहिले आहे. मला अशा भक्तांबद्दल किंव येते. पण हे भक्त सरळ ती तिकीटे साईंच्या नावाखाली विकत घेतात. ही प्रथा सामान्य लोकापेक्षा थोडी जास्त ज्याला आपण सुशिक्षित म्हणतो, त्यांच्यात जास्त आहे. हा प्रकार आपण सहज बंद करू शकतो.

उदाहरण घ्यावयाचे झाल्यास असे की, आपण बाजारातून माल खरेदी करताना त्या मालाचा प्रथम भाव विचारतो, व पटल्यास पैसे देतो. माल घेताना आपण किती चोखंदळ असतो. हे प्रत्येकाने ठरवावे. माल ज्यावेळेस आपण घेतो तेव्हा त्या मालाचे वजन करतो. एका तराजुच्या पारड्यामध्ये माल व दुसऱ्या तराजुच्या बाजूस वजने असतात. वजनाकडील बाजूची आपणास माहिती असते. मालाचे वजन बरोबर होण्यासाठी मधला तराजूचा काटा बरोबर मध्यभागी यावा लागतो व तो तसा आल्यावरच आपण माल घेतो. तसेच श्रद्धेचे ठरवावे. एका मनाच्या तराजूत कुठले फळ हवे ते टरवावे व दुसऱ्या बाजूला आपली श्रद्धा ठेवावी. हे ज्यावेळीं समतोल होईल त्याचवेळी साई व्यवहार पूर्ण करतील नाही तर कुछ भी नहीं।

श्रीक्षेत्री शिर्डी ह्या ठिकाणी आपल्या पैकी बरेच भक्त वारंवार जातात. तसे येथे जाणे अतिशय चांगले आहे, आणि असे जाणे प्रत्येकाच्या भक्तिवर, आर्थिकतेवर अवलंबून आहे. पण मला असे वाटते की, जर आपणच नेहमी तेथे जात राहिलो, तर निदान कमीत कमी एका नव्या भक्ताची आपण नकळत अडचण बनत असतो. आणि मग नवीन येणाऱ्या भक्ताला जर गैरसोय दिसून आली तर मात्र त्याला आपण जबाबदार रहातो. तेव्हा आपण भक्तांनी Holiday वगैरे न पहावा मध्येच जावून दर्शन घेवून यावे अगर न पेक्षा आपल्या जाण्यायेण्याच्या खर्चाचा काही भाग संस्थानला पाठवावा म्हणजे ती एक श्रीसेवा योग्यच ठरेल.

त्याच प्रमाणे आपण आपणास आलेल्या अनुभवाच्या गोष्टी चारचौघात कथन करताना त्या गोष्टी साध्य होण्यासाठी, किती प्रयत्न केले. हे प्रथम सांगावे व श्रींचा आर्शिवाद त्याला होता, असे सांगून साईभक्तांना श्रद्धा किती कष्टाने तयार होते, व प्रामाणिकपणामुळे तिचे फळ मिळते असे दिसून येईल

नाही तर बरेच जणं क्षणिक उत्साहाच्या भरात वहात जातात, व अपयशाचे खापर आपणावर फोडतात.

शेवटी जे जे लोक ज्या ज्या क्षेत्रात आहेत, त्या प्रत्येकाने थोडा वेळ काढून मोफत इतरांना जर स्वतःची शिकवणूक दिली, तर ती एक सेवाच होईल ह्याचा अर्थ शिक्षक भक्ताने गरीब विद्यार्थ्यास मोफत शिकवणी, डॉक्टराने गरिबांसाठी मोफत तपासणी श्रीमंताना गरीबांसाठी थोड्या प्रमाणावर आर्थिक मदत वगैरे.

मानव समाज एक आहे. आपण सारे भाऊ भाऊ आहोत त्या परमेश्वराची आपण सारे लेकरे आहोत. ह्या प्रमाणे वागल्यास ते व्यवहाराला धरून होईल, व ह्याच बरोबर साईंचे आर्शीवाद आपणास मिळतीलच हे निश्चित समजा. ☆

# मोहिते बाबांच्या मंदिरासाठी

## शिरडीचे साईबाबाचा दुसरा प्रयोगही हाऊसफुल्ल

वरळी जांबोरी मैदानातील श्री मोहिते बाबांच्या श्रीसाईनाथ मंदिराच्या विस्तार व सुधारणा दुरुस्ती कामकाजासाठी शिरडीचे साईबाबा या नाटकाचा दुसरा प्रयोग ५ फेब्रुवारी ८१ रोजी रात्रौ ८-३० वा. दादरच्या शिवाजी मंदिरात लावण्यात आला होता. या प्रसंगी सुविख्यात साईभक्त डॉ. के. बी. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. या प्रसंगी प्रास्ताविक व स्वागतपर भाषण श्री. प्रकाश परब, अध्यक्षीय भाषण श्री चंद्रकांत सामंत व आभार प्रदर्शन श्री. अनंत बागवे यांनी केले. डॉ. गव्हाणकरांनी आपल्या भाषणात ट्रस्टच्या कार्याचा गौरव करून शुभेच्छा व्यक्त केल्या व साईबाबांच्या संबंधीच्या गोड आठवणी सांगून प्रेक्षकात आनंद निर्माण केला. व शंभर रुपयांची देणगी बाबांच्या मंदिरास जाहिर केली. त्यानंतर मोहिते बाबांच्या हस्ते त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मोहितेबाबा व कुमार सेन गुप्ते यांचाही पुष्पहार घालून गौरव करण्यात आला.

# मी बी. ए. पास झाले

—नीता ना. सावंत
कस्टमस ९ सेन्ट्रल एक्साईज क्वार्टर्स
बी. ५ कात्रक रोड वडाळा मुंबई ३१

● आमचेकडे दरमहा येणारा "साईलीला" ह्या खास साईबाबांवर आधार-लेला अंक वाचताना, त्यातील वाचकांना येणारे अनुभव वाचून मी चकीत व्हायची. त्या अनुभवानी बाबांवरची माझी श्रद्धा, भक्ती अधीकच दृढ झाली, आणि आता तर माझ्या स्वतःच्याच आयुष्यात बाबांनी माझ्यावर केलेली कृपा, मला जन्मभर विसरता येणार नाही. त्याचीच ही हकीकत.

गेल्यावर्षी मी बी. ए. च्या शेवटच्या वर्षाला होते. शक्य झाल्यास मला पुढे शिकायचं होतं. म्हणून मी परिक्षा जवळ येताच जिद्दीने खूप अभ्यास केला होता. प्रत्यक्ष परिक्षेत, अभ्यास तयार असूनही पेपर्स मला तितकेसे चांगले गेले नव्हते, पण पास व्हायची पूर्ण खात्री होती.

पण जेव्हा रिझल्ट लागला, तेव्हा मी आत्मविश्वासाने रिझल्ट पहाण्यासाठी युनिव्हर्सीटीत गेले आणि मला धक्काच बसला! पास होणाऱ्याच्या यादीत माझा नंबरच नव्हता मी सगळीकडे नीट पाहिलं, मन सुन्न झाले होते. कसेतरी पाय ओढीत चर्चगेट स्टेशनवर आले. अति निराशेने गाडीखाली जीव झोकून द्यावासा वाटत होता.

आठ दिवसानी मला माझे मार्कस कळले, तेव्हा मला पुन्हा धक्का बसला. सगळ्या विषयात मी पास होते आणि एकाच विषयात मी गैरहजर असल्याचे कळविले होते.

माझ्यात पुन्हा उत्साह आला. आता बाबाच माझ्यासाठी काहीतरी करतीलच, बाबांना मी विनवणी केली, एवढा मी अभ्यास करूनही मी नापास झाल्याचं बाहिर झालं पण आता मला तुम्हीच तारा कारण प्रेतातही पुन्हा जिवंतपण आणण्याची किमया तुम्हीच केली. आता माझाही रिझल्ट बाबांच्या हाती.

. मी पुन्हा युनिव्हर्सीटीत अर्ज केला पंधरा-विस दिवसानी मी पास झाल्याचं युनिव्हर्सीटीहून पत्र आलं. मला अतिशय आनंद झाला. अखेर माझी प्रार्थना बाबांनी ऐकली होती. योगायोगाने मला कॉलेजमध्ये पुढे शिकण्यासाठी ॲडमिशन नही मिळाली ही सारी बाबांचीच कृपा आहे असंच मी मानते.

# तुमच्या सामान्य ज्ञानाची कसोटी

-श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला पश्चिम, मुंबई ४०००७०

[खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा. उत्तरे याच पानावर उलटी छापली आहेत.]

१. बाबा चांदभाईबरोबर जेव्हा शिर्डीला आले तेव्हा ते खंडोबाच्या देवळात उतरले.
२. बाबा व मोइनुद्दीन यांजमध्ये कुस्ती झाली असता बाबा कुस्ती जिंकले.
३. बाबा नेहमी चावडीत राहात.
४. दरवेशांच्या वाघाने बाबांसमोर प्राण सोडला.
५. बाबांचा व शामाचा ७२ पिढ्यांचा संबंध होता.
६. बाबा राहूरीला खुशालचंद शेट यांजकडे जात.
७. काकासाहेब दिक्षीत हे प्रसिद्ध डॉक्टर होते.
८. खापर्ड्यांच्या मुलाच्या प्लेगच्या गाठी बाबांनी आपल्या अंगावर घेतल्या.
९. चोळकरांनी आपले काम होईपर्यंत दूध सोडले होते.
१०. बाबांच्या गुरूंचे स्थान आंब्याच्या झाडाखाली आहे.
११. बाबांनी रामनवमीला देह ठेवला.
१२. बाबांना धौती पोती खंडयोग अवगत होते.

उत्तरे १. बरोबर, २. चूक, ३. चूक, ४. बरोबर, ५. बरोबर, ६. चूक ७. चूक, ८. बरोबर, ९. चूक, १०. चूक, ११. चूक, १२. बरोबर.

# A MISSION DIVINE

## साईबाबांच्या जीवनावरील एक असामान्य इंग्रजी कादंबरी

## परिक्षण

जवळ जवळ दीड वर्ष साईभक्तांना प्रतिक्षा करायला लावून वरील कादंबरीचे प्रकाशक आणि लेखक श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर यांनी जगातील हजारो साई-भक्तांना या अद्‌भूत पुस्तकाच्या रूपानं मेजवानीच दिली आहे असं निःशंकपणे म्हणता येईल. पुस्तकाच्या प्रकाशकांनी पूर्वी दिलेल्या काही जाहिरातीतून म्हटल्या-प्रमाणे हे पुस्तक वाचताना वाचकाला न केवळ अननुभूत समाधीकडे अन् शांतीकडे नेतं परंतु त्यानंतरही शिर्डीच्या या परमेश्वराच्या गाढ चिंतनाचा अखंड साक्षात्कार घडवितं! लेखकानं इतक्या प्रभावीपणे साईजीवनाचे सर्व पैलू समर्थपणे मांडले आहेत. साईचे मति गुंग करणारे चमत्कार लेखकाने नाट्यपूर्ण वर्णनाने खुलविले आहेतच–पण त्याही पलिकडे जाऊन साईंची अध्यात्माची कळकळीची शिकवण वाचकांच्या हृदयाचा ठाव घेईल अशा भाषेत त्यानं त्यांच्या गळी उतरविण्यात यश मिळविले आहे. साईंचं हे कादंबरीरूप चरित्र प्रत्येक साईभक्तानं याच लेखकाची मूळ कादंबरी "मशिदीत प्रगटला परमेश्वर!" ही वाचलेल्या वाचकानंसुद्धा ती विकत घेऊन संग्रही ठेवावी इतकी ती रम्य झाली आहे. कारण एकदा वाचल्यानंतर ती पुन्हा पुन्हा वाचण्याचा मोह कोणालाही टाळता येत नाही. त्यामुळे वाचक बाबांच्या केवळ वरवरचा भक्त न राहता तो पूर्णतः साईभक्तीत डुंबून जातो असा अनुभव आहे. साईजीवनाचं इतकं उत्कृष्ठ दर्शन आतापर्यंत कोणत्याही पुस्तकात झालेलं नाही. लेखकाला बंगलोर येथील श्री. ए. एन्. रामस्वामी या साईभक्ताच्या आलेल्या पत्राचा उताराच आम्ही इथं उधृत करीत आहोत. त्यावरून या पुस्तकाचं मूल्यमापन एका वाचकाच्या दृष्टीतून कसं होतं हे दिसून येईल ते म्हणतात.

"Your masterpiece book 'A Mission Divine' was received by me duly on 27-11-80. I started 'Pothi' immediately after its receipt. Lo! What a marvellons book you have written! Far superb presentation. Simply grand style of dialogue, skillful imagination, simplicity of in import and yet digni-

fied enough unfolding the myriad aspects of the 'Divine Saileela'! Your book is UNCOMPARABLE, UNPARALLELED SUPREME, SUBLIME and STUPENDOUS! Shri Junnurkarji, verily I do not have words sufficient to describe more succinctly! My heart-full and affectionate congratulations to you! You are really blessed by Lord Sai!"

हे पत्र वाचल्यानंतर आम्हाला मात्र एका गोष्टीचं राहून राहून आश्चर्य वाटतं की श्री. जुन्नरकर हे एक अभिजात चित्रपट दिग्दर्शक असून त्यांच्या हातूनच साईंच्या जीवनावरील चित्रपट का निघू शकला नाही? आतापर्यंत आलेल्या व्यापारी दृष्टीकोनातून चित्रीत झालेल्या चित्रपटांपेक्षा तो अनंत पटीनं यथार्थ आणि उत्कृष्ट झाला असता यात शंकाच नाही!

["A MISSION DIVINE!" प्रकाशक : प्रशान्ती प्रकाशन, ५ वसंत अपार्टमेंटस प्लॉट ४७, शिंपोली मार्ग, बोरीवली (पश्चिम), मुं. ४०००९२ मूल्य रु. ४५·००

—साईनंद

## इंदिरा आईसाहेब बंगाळे यांचे निधन

दादर गोखलेरोड दक्षिण येथील दलास बिल्डिंग मधील सुविख्यात श्री देवी तुळजाभवानी भक्त सौ. इंदिराबाई आईसाहेब नारायण बंगाळे यांचे रविवार ता. १५–२–८१ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. काही दिवसापूर्वीच त्या अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, तुळजापूर, कोल्हापूर इ. तीर्थक्षेत्रे करून आल्या होत्या. त्या परमसाईभक्तही होत्या. त्या हवेतून क्षणार्धात सुगंधी उदी काढीत असत. त्यांचा परिचय श्रीसाईलीला मे १९८० अंकात गाठीभेटी या सदरात प्रसिद्ध झालेला आहे. त्या ५५ वर्षांच्या होत्या.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# श्री साईगीत तुषार

परीस लोखंडाला आपल्याकडे आकर्षून घेतो त्याचे सोने करण्यासाठी धरणीमाता आकाशातील जलधारांना आपल्यात सामावून घेते. जगाच्या कल्याणासाठी तद्वतच साईनी गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांना आपल्या सामर्थ्याने आकर्षूण घेतले. एक शीघ्र कवि, चांगला तमासगीर सरकारी पोलीस खात्यातील जमादार ह्या सार्‍या विशेषणांचा त्याग करावयास लावले. प्रथम सहस्त्रबुद्धे तयार होईना पण सातेगाव, भालगाव येथे दरोडा पडला. एक मारवाडी ठार झाला. सोने, चांदी, पैसे मिळून आठ हजाराचा माल पळवला चोरांना पकडण्याची कामगिरी सहस्त्रबुद्धेनवर आली. गोदावरीचे पवित्र जल हातात घेऊन शपथ घेतली. जर चोर मिळाले. तर साईचरणी येईन. अखेर सारे चोर चतुर्भूज झाले व सहस्त्रबुद्धे शिर्डीला आले, आणि सत्संगाच्या सहवासाने संत शिरोमणी दासगणू म्हणून प्रसिद्ध झाले.

कशी झाली साई प्रित, झाला गणू हा महंत  
साई पाषाण तरले, एक एका उद्धरीले ॥ धृ० ॥

साईनाम त्यांचे ओठी  
आले कसे हो अघटी  
छंद होता तमाशाचा  
कवि होता प्रतिभेचा  
चाकरी होती फौजदाराची, सवय होती लाचारीची ॥ १ ॥

साई कृपेने वेढले  
माया जळी जागृत केले  
पूर्ण झाले सारे भोग  
वाल्या होई हो वाल्मीक  
निष्ठा होती हो सरकारी, चिंता भासे आयुष्याची ॥ २ ॥

सातेगाव दरोड्याची  
खबर आली गणूजीशी  
केला साईचा हो धावा  
शपथ घेई गोदाईची  
सही सलामत ठरलो, येईन तव चरणांशी ॥ ३ ॥

आश्वारुढ होवूनीया
चोर शोधी साऱ्या वना
मार्ग त्याचा हो भंगला
दैव आले हो सेवेला
चोर आले त्यांचे हाती, साई मानी हो विभुति ॥ ४ ॥

नट नर्तक मंदिरी
जाऊनीया डफ फोडी
सोडी अविचारी मार्ग
साई चरणी लीन होई
केला अहिल्या उद्धार, झाला संत शिरोमणी ॥ ५ ॥

गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांनी आपला डफ नट-नर्तिकेच्या मंदिरात फोडून टाकला व कायमचे श्रीसाई चरणी लीन झाले. त्यांनी आपले वास्तव्य शिर्डीला ठेवले. परंतु दर वर्षी पंढरीची न चुकता वारी करणारा हा वारकरी एक दिवस लाडक्या विठ्ठलाच्या भेटीस आतूर झाला. सतत मनात विठ्ठलाचे प्रेम भरले. व पंढरीला जाण्यास श्रीसाईंची अनुमति मागावयास आले तेव्हा साई म्हणाले. अरे गणू तुझा पांडुरंग तुझ्या जवळ असताना कशाला पंढरपूरला जातोस. तुझा पांडुरंग तुला भेटेल. शोध त्याला आणि क्षणाचाहि विलंब न होता. साईचरणी चंद्रभागा धावत आली. दोन्ही पायाच्या मधून पाणी वाहू लागले. आणि त्या चंद्रभागेच्या समोर साई साक्षात पांडुरंगाच्या रुपात दोन्ही हात कडेवर ठेवून आपल्या लाडक्याकडे वात्सल्याने पहात होते, व जणू काही सांगत होते. तुज आहे तुज पाशी परी तू जागा चुकलाशी.

ब्रम्हानंदी गणू रंगला भक्तीने होई दंग
उभा विटेवर चरण ठेवूनी, साई प्रभू पांडुरंग
नामयाला देव भेटला
शबरी बोरे देई प्रभुला
पुंडलीकाने उभा ठेवला, अजून राहि पांडुरंग ॥ १ ॥

दासगणूच्या मनी प्रगटले
पाहून यावे ब्रम्ह सावळे
बहू दिसाचे स्वप्न भंगले, दर्शन दे पांडुरंग ॥ २ ॥
दासगणूने भाष्य वर्तले

इप्सित त्यांचे साई कळले
शिर्डी क्षेत्र हे पंढरी झाले. गणू शोधी पांडुरंग ॥ ३ ॥
रुप सावळे समोर पाहिले
विठ्ठल रुपी दर्शन दिधले
भेद मनींचे सारे शमले, दिसे साई पांडुरंग ॥ ४ ॥
चंद्रभागा धाव घेई
साईच्या हो चरणी येई
आज खरोखर उभी पुण्याई, भेटे हो पांडुरंग ॥ ५ ॥
विठ्ठलाचे दर्शन घेवून
काव्य प्रतिभा येई उसळून
सरस्वती हो येई धावूनी, दंग होई गणू संग ॥ ६ ॥

—श्री सुहास देसाई


'साईलीला' लेखक, कवि-बंधु भगिनीनो,

शिरडी सम्मेलनात तुम्ही माझ्या साई जीवना वरील कादंबऱ्या प्रित्यर्थ केलेल्या गौरवाबद्दल धन्यवाद ! मी तर म्हणेन हा गौरव बाबांचाच !

# "मशिदीत प्रगटला परमेश्वर !"

आणि

# "A Mission Divine"

हे दोन्ही अप्रतिम ग्रंथ (वाचकांच्याच अभिप्रायानुसार) साईनाथांचा प्रसादच आहेत-प्रासादिक आहेत. तुम्ही सर्वांनी हे ग्रंथ संग्रही ठेवावेत म्हणून तुम्हालाच केवळ सवलतीत मिळतील.

इतरांसाठी मराठी ३६ रु. इंग्रजी ४५ रु. टपाल खर्च ४-५० रु.

आजच लिहाः **प्रशांति प्रकाशन,** ५ वसंत अपार्टमेंटस, कस्तूर पार्क, शिंपोली रोड, बोरीवली (प.) मुंबई ४०० ०९२



अहो आश्चर्यम् ! अहो आश्चर्यम् !

विश्वास ठेवा अगर ठेवू नकात !

# पण सुहासला श्रीबाबांचे साक्षात् दर्शन घडून जीवदान मिळाले

– श्री. पांडुरंग मोरे
एम. आय. जी. कॉलनी,
वांद्रा, मुं. नं. ५१

● कुमार सुहास जयवंत पवार. वय वर्षे साडेचार. (वडील जिल्हा परीषद उपाध्यक्ष-ठाणे) परळच्या वाडिया हॉस्पीटल या मुलांच्या रुग्णालयात ता. १४-२-८१ रोजी रात्री ३वा. इंटेसिव्ह केअर युनिटमध्ये ॲडमिट. ऑक्सीजनचा पुरवठा व सलाइन पण चालू. परिस्थिती मिनिटा-मिनिटाला गंभीर. इंटेसिव्ह केअर युनिट रुममध्ये ओळखीचे डॉ. जयंतराव जाधव व एक रुग्ण-परिचारिका हजर. बाहेरून काचेतून मुलाचे आईवडील सारी परिस्थिती पहात आहेत. डॉक्टरांचे त्याच्यावर उपचार चालू आहेत आणि एकदम सुहास डॉक्टरांना म्हणाला, "अहो डॉक्टरकाका स्टूलावरून उठा आणि साईबाबांना बसण्यास स्टूल द्या !" सुहास हे काय बरळतोय म्हणून डॉक्टर विचारतात तरी सुद्धा पुन्हा सुहास तेच म्हणतोय. "अरे सुहास बाळ ! तू असा काय बरं बोलतोस ? मला कुठे काय साईबाबा दिसत नाहीत ते !"

"अहो डॉक्टरकाका, हे काय साईबाबा ! उभे आहेत ते. येथे मला तर ते दिसतात उभे आहेत ते येथे. तुम्ही त्यांना बसायला स्टूल का देत नाही !"

इतक्या लहान वयाचे बालक त्याला साईबाबा हे नाव फार तर ऐकून किंवा त्यांचा फोटो बघून माहित असेल एवढेच काय ते ! पण काय असेल ते असो. सुहासला या अशा गंभीर जीवनमरणाच्या संघर्षात सुहासजवळ साईबाबा आले खरे ! अगदी खरोखरच ! साक्षात् त्यांचे दर्शन त्याला घडले आणि तो जगला ही खरोखरच साईबाबांची कृपाच म्हटली पाहिजे. त्याचे असे झाले.

छोटा सुहास २४ जानेवारीपासून आजारी होता. रोज रात्री त्याला ऑक्सीजन नि सलाईन लावावे लागे, त्याला झोपेत श्वसन बरोबर करताच येत नसल्यामुळे २४ जानेवारीपासून तो १३ फेब्रुवारीपर्यंत ठाण्याला डॉ. अग्रवाल इस्पितळात होता तिथे त्याच्या आजाराच्या बाबतीत डॉक्टरी उपाय झाले. सर्व त्या डॉक्टरी

परीक्षा झाल्या, क्ष-किरणांनी योग्य ती छायाचित्रे पण घेतली पण काही उपयोगच होईना. सुहास दिवसा चांगला खेळत असे पण तो रात्री झोपताच तासाभराने ऑक्सीजन व सलाइन लावावे लागे. रोजची इंजेक्शने व औषधे याने तर त्याची प्रकृती मलूल व अशक्त होत चालली. शेवटी त्याला परळच्या वाडिया मुलांच्या रुग्णालयात सुविख्यात बालरोग तज्ज्ञ डॉ. मरचंट यांना दाखविले. त्यांनी त्याला तपासले खरे पण ते त्याच्या या विकाराबाबत काहीएक मानायलाच तयार होईनात म्हणून त्याला हॉस्पीटलमध्ये ॲडमिटच त्यांनी केले नाही. त्यामुळे सुहासला जवळच आमच्या कडे ठेवावे व रात्री तो झोपल्यावर त्याच्या श्वासोच्छवासाला अडथळा सुरू झाला की लगेच हॉस्पीटलात आणून ॲडमिट करावे असे ठरले. त्याप्रमाणे त्याला ठेवले गेले व रात्री त्याला श्वसनाला त्रास सुरू झाला तेव्हा ओळखीचे डॉ. जयंतराव जाधव यांना बरोबर घेऊन वाडियात ॲडमिट केले गेले. तिथे सुद्धा त्याला ऑक्सीजन व सलाइनवर ठेवले गेले. नंतर दुसऱ्या दिवशी डॉ. मर्चंटना रात्रीची सर्व परिस्थिती इतर डॉक्टर मंडळींनी समजावून सांगितली तेव्हा त्यांनी सुहासची 'ब्रॉंकोस्कोपी' करणे आवश्यक आहे त्याचेवर सर्व इलाज झाले आहेत तर हा एक शेवटचा इलाज करून पाहून या असे सांगितले. यासाठी योग्य त्या कागद पत्रावर आईवडीलांची सही हवी होती पण ते बिचारे तिथे आले नव्हते मग जबाबदारी पत्करून सही करणार कोण ? पण सुदैवाने सुहासला त्या दिवशी जेवण दिले गेले होते. त्यामुळे त्या दिवशी ब्रॉंकोस्कोपी (Broncho-Scopy) टेस्ट न होता ती दुसऱ्या दिवशी करण्याचे ठरले आणि अगदी त्याच दिवशी इंटेसिव्ह केअर युनिट रुममध्ये डॉ. जयंतराव जाधव यांना साईबाबा उभे आहेत तुम्ही उठा नि त्यांना बसायला स्टूल द्या असे सांगून सुहासला बाबांनी चक्क दृष्टांत दिला.

डॉ. जाधवांनी खोलीच्या बाहेर येऊन ही आत घडलेली हकीगत सांगितली तेव्हा आम्हाला आश्चर्य तर वाटलेच पण साईबाबा त्याच्या पाठीशी आहेत त्याला आता भिती राहिली नाही म्हणून आम्ही त्याच्या आईवडिलांना धीर दिला. त्यांची परोपरीने समजूत घातली. त्याच्या आईवडिलांची मनस्थिती मोठी चमत्कारीक झाली होती. ते अक्षरशः गर्भगळीत झाले होते. मुलाची अवस्था बघून तर त्यांना थंडीताप आला होता. रात्रभर आम्ही सर्व जागे होतो व हॉस्पीटलात बसून होतो.

श्रीबाबांनी दर्शन दिलेली रात्र उलटली व सकाळी साडेदहा वाजता के. इ. एम. हॉस्पीटलमध्ये डॉ. कर्णिक व डॉ. जयंत जाधव व इतर हजर असलेल्या डॉक्टर मंडळींनी सुहासची ब्रॉंकोस्कोपी टेस्ट अगदी यशस्वीरित्या पार पाडली; आणि त्याच दिवशी सायंकाळी सुहास हसता-खेळता दिसू लागला.

'ब्राँकोस्कोपी' म्हणजे श्वसननलिकेत रबरीनलिका सोडून देऊन छोट्या बॅटरीच्या उजेडात श्वासमार्गात काही अडथळे असल्यास ते विशिष्ट उपकरणांच्या सहाय्याने ते अडकलेल खेचून घेतले जाते यासाठी चित्तशांती ठेवावी लागते व अतिशय कौशल्याची पण गरज असते. डॉक्टर मंडळींनी या टेस्टने सुहासच्या श्वासनलिका मार्गातून काय काढले ठाऊक आहे! काय असेल ते! एक साधे चिंचोक्याचे दणकट फोलपट!!

पण काय असेल ते असो. साईकृपेने सुहासची या विचित्र आजारातून सहीसलामत सुटका झाली. त्याचा चक्क पुर्नजन्म झाला व त्याला त्या परिस्थितीत बाबांनी दर्शन देऊन डॉ. जयंत जाधवांना पण साईंच्या अस्तित्वाचा पुरावा आणून दिला. अक्षरशः अवघ्या पंधरा दिवसापूर्वी घडलेली ही सत्यकथा आहे तुम्ही विश्वास ठेवा अगर ठेवू नकात पण हे घडले आहे मात्र खरे.

# शिरर्डी-वृत्त माहे जानेवारी सन १९८१

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. प्रजासत्ताकदिन रविवारच्या सुट्टीला जोडून आल्यामुळे दि. २५-१-८१ व २६-१-८१ या दोन दिवशी अतिशय गर्दी झाली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

**भजन, गायन, वादन वगैरे :** १) सर्वश्री भोलानाथ रा. समेळ, मुंबई. २) हेमचंद्र द. तावडे, मुंबई. ३) मधुकर का. ठाकूर, मुंबई. ४) गौरीशंकर स. चौकवाले. ५) दत्तात्रय दयाळ ६) अरुण तु. दयाळ. ७) गोविंदकुमार सु. लखरे सातारा. ८) कु. विजयाबाई मद्रास ९) स्वामी संजयानंद व सौ. मीरा संजयानंद, बद्रीनारायण. १०) पी. पांडुरंगम नायडू, हैद्राबाद. ११) सुपर स्टार ऑर्केस्ट्रा लालबाग मुंबई नं. १२ ऑर्केस्ट्रापार्टी व तेवीस कलाकार यांनी कार्यक्रम केला. १३) गु. पा. खानोलकर. १४) बा. म. धुमडे. १५) एस. जी. बोगळे. १६) ए. एस. केसरकर. १७) शेखर मांडे, मुंबई. १८) जयवंत कुलकर्णी मुंबई. १९) एस. डी. कुलकर्णी, मुंबई. २०) बाळ साठे मुंबई. २१) अब्दुल रशीद, छिंदवाडा. २२) गोविंददास सवकद. २३) शामराव चुटेले छिंदवाडा. २४) श्रीमती नटेश्वरी गुप्ता, हैद्राबाद. २५) पियानाथ गुप्ता, हैद्राबाद. २६) श्रीध्वजाधारी सेवामंडळ बॅण्ड पथक मुंबई १३. २७) साई परिवार भजन मंडळ, न्यु दिल्ली. २८) नलिनी मुळगावकर मुंबई. ९) उमेश बा. मुळगावकर. ३०) सितला प्रसाद मुंबई. ३१) आप्पा सामंत, मुंबई.

३२) श्रीराम विष्णू सातर्डेकर मुंबई. ३३) माणिक प्रभूदास महाराज पंढरपूरकर, हैद्राबाद. ३४) श्रीवई ईश्वरैया. सिकंदराबाद. ३५) सौ. जोती ए. मनुजा, मुंबई. ३६) सौ. अलका भा. रिसवडकर मुंबई.

**प्रजासत्ताक दिन :** दि. २६ जानेवारी १९८१ रोजी सकाळी ७-३० वा. मंदिराचे गच्चीवर माननीय रिसीव्हर श्री. क. हि. काकरे यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. संस्थान कर्मचारी, सेवेकरी गावातील प्रतिष्ठित नागरीक, श्रींच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त, श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षकवर्ग विद्यार्थी विद्यार्थीनी, बॅण्डपथक होमगार्ड पोलीस उपस्थीत होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थितांना चहापान दिल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

**बक्षिस समारंभ :** सन १९८० सालाकरिता उत्कृष्ट स्वच्छता कामगार म्हणून, सौ. सुशिलाबाई शंकरराव गोडखिंडी पारितोषिक (चांदीचे पदक) दाजीबा लहानू साबळे. कायम स्वच्छता कामगार साईबाबा संस्थान शिरडी यांना मा. काकरे साहेब यांचे शुभहस्ते देणेत आले. तसेच मिळालेल्या वस्तु प्रामाणिकपणे संस्थानमध्ये परत केल्याबद्दल काही संस्थान कर्मचाऱ्यांचाही सत्कार करणेत आला.

**राज्यपालांची शिरडीस भेट :** मा. नामदार श्री. ओ. पी. मेहरा, राज्यपाल महाराष्ट्र राज्य मुंबई हे शनिवार दि. ३१-१-८१ रोजी सकाळी ११-२०ला साईबाबांचे दर्शनासाठी आले. अभिषेक पूजा, आरती झाल्यावर दुपारी १२-४५ ला गेले.

**हवापाणी :** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवा थंड असते.

## भुलेश्वर लायन क्लब

भुलेश्वर येथील लायन क्लबला येत्या ४ मार्च ८१ ला सात वर्षे पूर्ण होत आहेत यानिमित्याने येत्या ४ मार्च रोजी तांडदेव-जरीवाला बिल्डिंगमध्ये एक कम्युनिटी सेंटर उघडण्यात येत असून त्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार हे करणार आहेत. अशी माहिती क्लबचे अध्यक्ष श्री. किशोरभाई मेहता यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कम्युनिटी सेंटरला एक टी. व्ही. सेट पण दिला जाणार आहे. या सेंटरमधून गरजूना विनामूल्य वैद्यकीय मदत विशेषतः हृदयविकाराच्या दुखण्यावर औषधोपचार तज्ञ डॉक्टरांकडून दिला जाणार आहे. अपंग वर्षानिमित्य अपंगांसाठी एक खास स्टॉलही उघडण्यात येणार आहे.

# घोषणा

श्रीसाईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीला बद्दल दरवर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा :—

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशनाचे स्थळ | ... | "साईनिकेतन," ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०००१४. |
| २) प्रकाशनाचा कालावधी | ... | मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | ... | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| राष्ट्रीयत्व | ... | भारतीय |
| पत्ता | ... | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा, मुंबई–४ ०००३१. |
| ४) प्रकाशकाचे नाव | ... | श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे |
| राष्ट्रीयत्व | ... | भारतीय |
| पत्ता | ... | 'साई निकेतन,' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४ ०००१४. |
| ५) संपादकाचे नाव | ... | श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे |
| राष्ट्रीयत्व | ... | भारतीय |
| पत्ता | ... | 'साईनिकेतन,' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४ ०००१४. |
| ६) हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक यांची नावे व पत्ते | | श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे यानुसार असे घोषित करीतो की वरील तपशिल माझ्या माहिती प्रमाणे व समजुती प्रमाणे सत्य आहे.

क. हि. काकरे
(प्रकाशकाची सही)
कोर्ट रिसिव्हर
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

मार्च १९८१



▲ श्री. काकरे साहेबांचा सत्कार करताना.

[ संमेलनातील दृश्ये ]

अध्यक्षांचा शाल व श्रीफळ देऊन साईबाबा संस्थानतर्फे कोर्टरिसिव्हर श्री. काकरेसाहेबांनी सत्कार केला, त्या प्रसंगी शेजारी डॉ. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर व कोचाचे पाठीमागे कु. रेखा दिघे व संस्थानचे कार्यालय अधिक्षक श्री. द. चि. पाठकसाहेब दिसत आहेत. ▼

